रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ११५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## अलिबागमध्ये आज मार्गदर्शक शिबीर

**अलिबाग :** शेतकरी कामगार पक्ष जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील पुरस्कृत, श्रीसंत सेना महाराज नाभिक समाज संस्था अलिबागच्या वतीने आधुनिक हेअर कटींग मार्गदर्शन शिबीर व सेमिनारचे आयोजन करण्यात आले आहे. भारतातील सुप्रसिद्ध हेअर डिझायनर उदय टक्के व सौंदर्य तज्ज्ञ हर्षदा टक्के यांचे प्रात्यक्षिकांसहित मोलाचे मार्गदर्शन मिळणार आहे. यावेळी चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. वेश्वी येथील मॅपल आयव्ही हॉटेलमधील सभागृहात सोमवारी (दि.२३) सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास हा कार्यक्रम सुरु होणार आहे.



# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. २३ सप्टेंबर २०२४

किंमत ४ ₹


## अंगणवाडी सेविकांचे उपोषणास्त्र

**मुंबई :** राज्यभरातील अंगणवाडीसेविकांना ३ हजार, मदतनिसांना २ हजार वेतनवाढ देण्याचा निर्णय महिला व बालकल्याण विकास विभागाने घेतला होता. या निर्णयाला वित्त विभागाने वेतनवाढीच्या प्रस्तावाला मान्यताही दिली होती. मात्र, त्याची अद्याप अंमलबजावणी न झाल्याने राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समिती सोमवारपासून बेमुदत उपोषणास बसणार आहे. तसेच २५ सप्टेंबर रोजी जेल भरो आंदोलन करण्यात येणार आहे. उद्या सकाळी १० वाजता आझाद मैदानावर समितीमधील ७ घटक संघटनांचे २५ नेते बेमुदत उपोषणात सहभागी होणार आहेत.

**आजचा अग्रलेख**

...तर आमच्याकडे हाके

**वेधक**

### पुढील पाच दिवस पावसाचे

**पुणे :** काही दिवसांच्या विश्रांतीनंतर राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने राज्यात पुन्हा पावसाचे आगमन होण्याचा अंदाज वर्तवला आहे. पुढील २४ ते २९ सप्टेंबर असे पाच दिवस मुसळधार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. मुंबई, उपगनर आणि ठाणे परिसरात जोराचा पाऊस पडेल. पूर्व विदर्भात देखील पाऊस आपली हजेरी लावेल. नागपूरमध्ये २४ सप्टेंबर रोजी मुसळधार पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यातील काही भागात पुढचे पाच दिवस पावसाच्या जोरदार सरी कोसळतील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला.

### ‘घड्याळ’ चिन्ह गोठवा!

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या जोरदार हालचाली सुरू झाल्या असतानाच अजित पवार गटाची डोकेदुखी वाढली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव व चिन्हाचा अंतिम फैसला होईपर्यंत अजित पवार गटाला दिलेले ‘घड्याळ’ चिन्ह गोठवा, अशी विनंती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सर्वोच्च न्यायालयाला स्वतंत्र अर्जाद्वारे केली आहे. याबाबत २५ सप्टेंबरला सुनावणी होणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे ज्येष्ठ वकील डॉ. अभिषेक मनु सिंघवी यांनी अर्ज केला आहे. अजित पवार गटाला दिलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ‘घड्याळ’ चिन्ह गोठवून त्यांना नवे चिन्ह द्यावे, असे अर्जात म्हटले आहे.

### प्रादेशिक भाषांना धोका

**मुंबई :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्याच्या शिक्षण विभागाचा तिसरी ते बारावीचा अभ्यासक्रम आराखडा अद्याप अंतिम झालेला नसतानाच आता अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सीबीएसई पॅटर्ननुसार अभ्यासक्रम राबवणे शैक्षणिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केले जात असतानाच आता राज्यातील शाळांमधील अभ्यासक्रम एनसीईआरटीकडे स्थलांतर होत असल्याची चिंता वाढत आहे, यामुळे प्रादेशिक भाषा नष्ट होतील, अशी भीती शिक्षकांनी व्यक्त केली आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम राबवण्याची, त्यासाठीच्या पुस्तकांची आखणी केल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी नुकतीच केली.

# कांदळवन प्रकल्पाला हरताळ ?

आविष्कार देसाई

। रायगड ।

विकासाच्या नावावर कांदळवनांची होणारी कत्तल थांबवण्यासाठी तसेच पर्यावरणाच्या रक्षणासाठी केंद्र सरकारकडून सातत्याने घोषा लावण्यात येतो. त्यानुसार चार वर्षांपूर्वी रायगड जिल्ह्यातील अलिबाग-वरसोली येथे पाच हेक्टर आणि तळा तालुक्यात मांदाड येथे दहा हेक्टर क्षेत्रावर कांदळवन उभारण्याचे नियोजन होते. आपत्ती व्यवस्थापनामार्फत सदरचा प्रस्तावदेखील पाठवण्यात आला होता. मात्र, केंद्र सरकारने या प्रस्तावाकडे साधे ढुंकूनही पाहिले नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे कांदळवन संवर्धन प्रकल्पाला हरताळ फासले गेल्याचे चित्र आहे.



- चार वर्षे प्रस्तावाकडे ढुंकूनही पाहिले नाही
- केंद्र सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

### कांदळवन म्हणजे काय?

कांदळवन (खारफुटी) ही एक समुद्र आणि खाडीकिनारी वाढणारी वनस्पती आहे. खारफुटी ही चिखलात, घट्ट माती नसलेल्या जागी आणि भरतीचे पाणी घुसणाऱ्या भागात मोठ्या प्रमाणात आणि वेगाने वाढते. मोठ मोठ्या लाटांमुळे होणारी जमिनीची धूप थांबवण्याचे प्रमुख काम ते करतात. खारफुटीच्या विस्तृत समूह मोठ्या प्रमाणात वाढता आणि स्थिरावतो, त्यांना कांदळवन म्हणतात.

#### केंद्र सरकारल प्रस्ताव सादर

निसर्गाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या कांदळवनांच्या सुरक्षेसाठी सरकारस्तरावर कार्यवाही सुरु करण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी सरकारला सविस्तर प्रस्ताव सादर केला होता. तो प्रस्ताव राज्य सरकाकडून अंतिम मंजुरीसाठी राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण-नवी दिल्ली यांना पाठविण्यात आला होता.

#### अन्नसाखळी रक्षणाचे काम

कांदळवनामुळे सागरी अन्नसाखळी अधिक मजबूत होते. त्सुनामी किंवा वादळी वाऱ्याचा वेग मोठ्या प्रमाणावर अडविण्यास मदत होते. खेकड्यासारख्या विविध जलचरांना, बगळे, स्विफ्ट, कावळे, घार, किंगफिशर, हॉर्नबील यासारख्या विविध प्रकारच्या पक्ष्यांकरिता अन्नसाखळीस पोषक वातावरण तयार होते. कांदळवन हे सदाहरीत असल्याने त्यांची पानगळ होत नाही.

**ठाणे जिल्ह्यातील अर्नाळा, वसई, पालघर व रत्नागिरी जिल्ह्यातील डोकमाळे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रामेश्वर तलेरे, मुंगे तलेरे अशा ठिकाणीदेखील कांदळवन उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते.**

गेल्या काही वर्षांमध्ये रायगड जिल्ह्यामध्ये झपाट्याने विकास होत आहे. स्वैर विकासाच्या नावावर निसर्गलाच गिळंकृत करण्याला मागे-पुढे पाहिले जात नाही. हजारो हेक्टर सुपीक जमिनींवर बुलडोझर फिरवला जात आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शेतीचे क्षेत्र नष्ट होतेच. त्याचप्रमाणे कोट्यवधी कांदळवनांच्या झाडांची बेसुमार कत्तल केली जात आहे. निसर्गाचा समतोल राखला नाही, तर निसर्ग आपल्याला धडा शिकवतो, हे वेळोवेळी आलेल्या आपत्तीवरुन आपल्याला दिसून येईल. एखादी आपत्ती आली की, केंद्रातील सरकारसह त्या-त्या राज्यातील सरकार आपण याप्रश्नी किती गंभीर असल्याचे भासवतात. त्यानंतर निसर्गाचा समतोल राखण्यासाठी विविध प्रकल्प हाती पान २ वर

> केंद्र सरकारला चार वर्षांपूर्वी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मात्र, अद्याप त्यामध्ये प्रगती झाल्याबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थान प्राधिकरणाला कळवण्यात आलेले नाही. याप्रकरणी नव्याने पाठपुरावा करण्यात येईल.
>
> – सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, रायगड

# युतीच्या काळात मुरूडचा विकास रखडला

**चित्रलेखा पाटील यांची टीका । नांदगावमधील मुस्लिम तरुणांचा शेकापमध्ये प्रवेश**





● (छायाचित्र : अमोल नाईक)

प्रकाश सद्रे

। मुरूड जंजिरा ।

ज्या लोकप्रतिनिधींना तुम्ही निवडून दिले आहे, त्यांनी गेल्या पाच वर्षांत विधानसभेत मुरुडचे प्रश्नच मांडले नाहीत. त्यामुळे मुरुडचा विकास रखडला असून, तालुका पाच वर्षे मागे गेला आहे. शासनाच्या अनेक योजना आहेत, त्या जनतेपर्यंत पोहोचतच नाहीत, अशी टीका शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडीच्या प्रमुख चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी रविवारी (दि. २२) नांदगावमध्ये बोलताना केली. दरम्यान, येथील अनेक मुस्लिम तरुणांनी शेकापमध्ये प्रवेश केला. त्यांचे चित्रलेखा पाटील यांनी पक्षाच्यावतीने स्वागत केले.

नांदगावमधील घोले राईस मिलच्या पटांगणावर शेतकरी कामगार पक्ष युनिटी ग्रुपच्यावतीने इंडिया आघाडीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. स्व. प्रभाकर पाटील यांचा आदर्श समोर ठेवून मी व माझा पक्ष काम करीत आहोत. बॅ. अंतुले साहेबांनी अलिबाग व मुरुड तालुके एकमेकांना जोडले. त्यांनी अखंड जपलेल्या सर्वधर्मसमभावाची आज समाजाला गरज आहे. आजचे सत्ताधारी जनतेच्या अनेक प्रश्नांची उकल करु शकले नाहीत, त्यांनी केवळ समाजा-समाजामध्ये जातीपातीत भांडणे लावण्याचीच कामे केली. म्हणूनच आज जो तो म्हणतोय, राज्यात महाविकास आघाडीचीच सत्ता येणार आहे. आघाडीतर्फे मला तिकीट मिळून मी निवडून आल्यास तुमचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे, असेही त्या पुढे म्हणाल्या. पान २ वर

# साखर चौथच्या गणरायाला निरोप



। अलिबाग । प्रतिनिधी ।

एक दिवस मनोभावे पूजा, सेवा केल्यानंतर साखर चौथच्या गणरायाला रविवारी सायंकाळी भावपूर्ण निरोप देण्यात आला. ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’ असे जड अंतःकरणाने आवाहन करीत जिल्ह्यातील ८७९ गणेशमूर्तींचे तलाव, नदी, समुद्रात विसर्जन करण्यात आले. दरम्यान, विसर्जन घाटांवर भाविकांची मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले.

साखरचौथच्या बाप्पाचे शुक्रवारी सकाळी वाजत गाजत स्वागत करण्यात आले. सकाळपासून भजनांसह सांस्कृतिक कार्यक्रम, बाल्या नृत्य व इतर मनोरंजनात्मक खेळ खेळत रात्रभर गणरायाची सेवा करण्यात आली. महिलांनीदेखील या उत्सवात सहभागी होत वेगवेगळ्या पारंपरिक नृत्यांचे सादरीकरण करीत जल्लोष साजरा केला. एक वेगळा आनंद व उत्साह प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. पान २ वर

# वाहतूक पोलीस ‘टार्गेट’वर

- प्रत्येक मशीनद्वारे दहा कारवाई करण्याचे आदेश
- टार्गेट पूर्ण करण्यासाठी वाहतूक पोलीस लागले कामाला

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

मशीनद्वारे दंडात्मक कारवाई करण्यास वाहतूक पोलीस कमी पडले आहेत. ‘टार्गेट’नुसार कारवाई करण्यास ते अपयशी ठरले आहेत. त्यामुळे हे टार्गेट पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यातील वाहतूक पोलीस कामाला लागले असल्याची माहिती खात्रीशीर सूत्रांकडून मिळाली आहे. प्रत्येक मशीनद्वारे दहा कारवाया पूर्ण करण्यासाठी वाहतूक पोलीस रस्त्यावर उभे राहू लागले आहेत.



> जिल्ह्यात साठ मशीन उपलब्ध आहेत. या मशीनद्वारे ऑनलाईन दंडात्मक कारवाई केली जाते. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांना शिस्त लावण्याचा एक प्रयत्न आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याला प्रतिदिन दहा कारवाई करण्याचे उद्देश दिले जाते. जेणेकरून बेशिस्त चालकांनादेखील वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याची सवय राहील.
>
> – श्री. लांडे, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा, रायगड

जिल्हा वाहतूक शाखेमार्फत जिल्ह्यातील वाहतूक कोंडी व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला जात आहे. जिल्हा वाहतूक शाखा एक स्वतंत्र यंत्रणा आहे. पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील वाहतूक नियंत्रणाचा कारभार पाहिला जातो. जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा वाहतूक शाखा आहे. पान २ वर

# डिझेलतस्करीची केंद्राने घेतली दखल

। रायगड । खास प्रतिनिधी ।

जिल्ह्यातील सागरी किनारपट्टीवर बेकायदा डिझेल तस्करीच्या घटना सातत्याने घडत आहेत. पोलीस आणि तटरक्षक दलाच्या डोळ्यात धूळफेक करुन अथवा या यंत्रणेने स्वतःच्या डोळ्यावर कातडी ओढली आहे का, याबाबतची तक्रार केंद्र सरकारकडे करण्यात आली होती. त्याची दखल आता घेण्यात आली असून, महाराष्ट्र शासनाकडून अहवाल मागितला आहे.

सागरी मार्गाने यापूर्वी अनेक देशविघातक कारवाया झालेल्या आहेत. त्यामुळे देशाची सुरक्षा धोक्यात आल्याचे सांगत राज्य शासनाकडून सुरक्षेच्या नावाखाली दरवर्षी करोडो रुपये खर्च केले जातात; परंतु तरीही ही सागरी सुरक्षा किती तकलादू आहे, हे डिझेल तस्करीतून समोर येत आहे. या डिझेल तस्करीविरोधात तक्रार दाखल झाल्यानंतर काही जुजबी कारवाया रायगड पोलीस आणि तटरक्षक दलाकडून केल्या जातात. येथील राजकीय पुढारी आणि अधिकारी यांच्या आशीर्वादने पुन्हा काही दिवसाने ही डिझेल तस्करी सुरु होत असते. नुकतेच तालुक्यातील एका जेट्टीवर हजारो गॅलन डिझेल उतरविण्यात आले. हे डिझेल उतरविताना तेथील स्थानिक मच्छिमारांनी पाहिले; परंतु करोडो रुपये खर्च होत असलेल्या सुरक्षा यंत्रणेला हा प्रकार का दिसला नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या सर्व प्रकाराची तक्रार अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केंद्र शासनाकडे केली होती.





**रायगडमधील रेवदंडा पोलीस ठाणे, तरणखोप पोलीस ठाणे पेण, यांच्या अंतर्गतसुद्धा डिझेल तसकरीच्या गुन्ह्याची नोंद आहे. रायगडमध्ये या टोळीवर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात डिझेल तसकरीच्या गुन्ह्याची नोंद आहे. तरी पण ही टोळी खुलेआम फिरुन बेकायदेशीर डिझेलचा धंदा करीत आहे. परंतु, त्यांच्यावर कारवाई होऊनसुद्धा त्यांना अटक झालेली नाही.**

मुंबई बंदरात येणाऱ्या मोठ मोठ्या जहाजांना भरसमुद्रात थांबवून त्यातील डिझेल लुटले जाते. यात जहाजाच्या अधिकाऱ्यांसोबत तस्करांचे संगनमत असते. काही वेळेस यात बळाचाही वापर केला जातो. जहाजातून लुटून आणलेले डिझेल येथील स्थानिक मच्छिमार, ट्रकचालक यांना विकून करोडो रुपयांचा काळा बाजार होतो. यास स्थानिक पोलीस, पान २ वर

**कोळंबीची आवक वाढल्याने मच्छिमार आनंदी**

# दर्याची दौलत गावली जाल्यान

- मोठ्या प्रमाणात नौका समुद्रात दाखल

। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।

दोन-तीन दिवसांपासून मुरूडजवळील पद्मजलदुर्ग समुद्र किनारपट्टीत कोळंबी मोठ्या प्रमाणावर मिळत असून, एकदरा, मुरूड आणि राजपुरी येथील सुमारे ५० नौका एकाच वेळी कोळंबी मासेमारी मोहिमेवर आरूढ झालेल्या रविवारी (दि. २२) दिसून आल्या. त्यामुळे मुरूड मार्केटमध्ये मोठ्या प्रमाणावर कोळंबीची आवक झाल्याचे दिसून आले. असे वर्षातील नेमकेच दिवस असतात, त्यावेळी कोळंबीची आवक वाढते. कोळंबीची आवक वाढती असल्याने खवय्यांची चांगलीच चंगळ झाल्याचे दिसून येत आहे.



मुरुडच्या बंदर मार्गावरून जाताना या नौकांची समुद्रातील साखळी लक्ष वेधून घेत आहे.

कोळंबीचा हंगाम मच्छिमारांना फायदेशीर ठरतो. कारण, पाऊस परतीच्या मार्गावर असताना कडक उन्हाळा सुरू होतो. ऑक्टोबर हिट कोळंबी सुकवण्यासाठी अतिशय उपयोगाची ठरते. कोळंबी सुकवून सोड बनवण्याच्या प्रक्रियेत महिला कामाला लागतात. त्यामुळे बंदरावर महिला भगिनींची मोठी लगबग दिसून येते. आज सोड्याचा भाव २२०० रुपये किलो असल्याने हंगामात जास्तीत जास्त कोळंबी सुकविण्याकडे कोळी बांधवांचा कल असतो. कारण, वर्षभराचा नफा या काही दिवसातून मिळवणे शक्य असते. पुढे नवरात्रोत्सव, दिवाळी पर्यटकांचा हंगाम असल्याने सोड्यांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढते. मुरुडचे सोडे प्रसिद्ध असल्याने इथे येणारा पर्यटक सोडे घेतल्याशिवाय जात नाही. त्यामुळे कोळंबीचा हंगाम सुरू झाल्याने कोळी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पान २ वर

# बांबू लागवडीचे उद्दिष्ट अपूर्णच

**रायगड जिल्हा परिषदेचे प्रयत्न अपयशी**

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दरडीपासून बचाव करण्यासाठी जिल्हा परिषदेने बांबू लागवडीवर भर दिला. यातून जमिनीची धूप थांबविण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील दरडग्रस्त भागात व मोकळ्या जागांमध्ये आठ लाख बांबूची लागवड करण्याचा उद्दिष्ट समोर ठेवले होते. परंतु, एक वर्ष होत आले तरी हे उद्दिष्ट पूर्ण करण्यास जिल्हा परिषद अपयशी ठरल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात फक्त दोन लाख बांबूच्या रोपांची लागवड करण्यात आल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे.

मागच्या दोन वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमध्ये जिल्ह्यातील अनेक भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. महाड येथील तळीये येथे २३ जुलै २०२१ मध्ये दरड कोसळली. त्यात अनेकांचा मृत्यू झाला. त्यानंतर पोलादपूर, कर्जत, खालापूर तालुक्यातदेखील दरड कोसळली. दरडीमध्ये सुमारे दोनशेहून अधिक नागरिकांचा जीव गेला. दगड, मातीने गावांतील घरे तसेच गावेदेखील उद्ध्वस्त झाली. या घटना घडून दोन ते तीन वर्षे होत आली आहेत. या दुर्घटनेनंतर दरड रोखण्यासाठी जिल्हा परिषदेने उपाययोजना सुरु केल्या. पान २ वर



> डोंगरभागात बांबू लागवडीला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. रोजगार हमी योजनेतून हे काम सुरू केले आहे. बांबू लागवडीचे काम चांगल्या पद्धतीने करण्यात आले आहे. परंतु, मजुरी अल्प असल्याने कामगार मिळत नाहीत. बांबूची रोपे उपलब्ध नसल्याने या कामाची गती कमी झाली आहे. मात्र, ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे, त्याठिकाणी महिला बचत गटामार्फत बांबूची रोपे तयार करण्याचा प्रयत्न सुरु केला आहे.
>
> – डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

# पालिकेच्या उद्यानाची दुरवस्था


(छायाचित्र : राजेश डांगळे)

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उद्यानात प्रवेश करताच स्वच्छता आणि हिरवळ पाहून मन प्रसन्न होते. मात्र, पनवेल महानगरपालिकेच्या नवीन पनवेल सेक्टर १४ येथील पोदी रस्त्याच्या लगत आमराईसमोरील प्लॉट क्रमांक ११ येथील उद्यानाची देखभाल दुरुस्तीअभावी दयनीय अवस्था झालेली पाहायला मिळत आहे. महापालिका उद्यान अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

या उद्यानात तुटलेले अवस्थेत लोखंडी दरवाजा, खिळखिळी झालेली खेळणी, वाढलेले गाजर गवत, ठिकठिकाणी साचलेला पालापाचोळा अशी परिस्थिती सध्या महापालिका विभागातील उद्यानांची झाली आहे. देखभालीअभावी उद्यानांची जागा ही मद्यपींनी व प्रेमीयुगुलांनी घेतली आहे. येथील नागरिकांनी महापालिकेच्या ढिसाळ कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या उद्यानाच्या बाजूस सभोवताल तसेच आतील बाजूस फेरफटका मारल्यावर दिसतो तो फक्त कचरा, झाडांचा पालापाचोळा, घाण पाण्याची डबकी. संरक्षण भिंतीजवळ कचरा, दारूच्या रिकाम्या बाटल्या दिसतात. दुपारी, सायंकाळी येथे प्रेमीयुगुल बसलेले असतात, तर रात्री मद्यप्रेमी. झाडांच्या फाद्या व त्यावर वेली वाढल्या आहेत.नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या उद्यानात महापालिकेचा कुठलाही साफसफाई कर्मचारी वर्षभर फिरकलेला नाही, असा आरोप येथील नागरिकांनी केला आहे.

एकीकडे शहरात महापालिकेचे अधिकारी तसेच येथील माजी नगरसेवकांची स्वच्छता मोहीम जोरात सुरू आहे. दुसरीकडे सिडकोकडून हस्तांतरण झालेल्या उद्यानाची देखभाल करण्यात महापालिका कमी पडत असल्यामुळे नागरिकांनी महापालिकाच्या भोंगळ कारभारावर नाराजी व्यक्त केली आहे.

# शहरी भागातील इच्छुकांची संख्या वाढणार

## राजकीय पक्षांपुढील डोकेदुखी वाढणार

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल विधानसभा मतदारसंघातदेखील तिकीट मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवार कामाला लागले आहेत. त्यातच आगामी विधानसभा निवडणुकीत पनवेल विधानसभेचा आमदार निवडण्यात शहरी भागातील मतदार निर्णायक भूमिका बजावणार असल्याचे चित्र लोकसभा निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट झाल्याने शहरी भागातील इच्छुक उमेदवारांच्या इच्छेला नवे धुमारे फ ुटले असून, इच्छुकांची वाढती संख्या सर्वच राजकीय पक्षांसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.

झपाट्याने सुरु असलेल्या विकास कामांमुळे एके काळी ग्रामीण विधानसभा मतदार संघ म्हणून ओळख असलेल्या पनवेल विधानसभा मतदार संघाची ओळख आता बदलली आहे. स्थापने पासून आगरी समाजाचे प्राबल्य असलेल्या या मतदार संघाची कॉस्मोपॉलिटन मतदार संघ म्हणून आता नवी ओळख निर्माण झाली आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघात ५४४ बूथ आहेत. त्या पैकी तब्बल ३७४ बुथ शहरी भागांत आहेत. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीचे खासदारकीचे उमेदवार श्रीरंग अप्पा बारणे यांना ग्रामीण भागातून अवघे नऊ हजार ४३० मताधिक्य मिळाले. तर, सिडको वसाहतींमधून १९ हजार ३०५ मते महाआघाडीपेक्षा जास्त मिळालेली आहेत. पनवेल शहरातून अवघी दोन हजार ३०३ मते श्रीरंग बारणे यांना महाआघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यापेक्षा जास्त आहेत. शहरी भागातून मिळालेल्या मताधिक्यामुळे खासदार बारणे यांचा विजय सोप्पा झाला. लोकसभा निवडणुकीत शहरी मतदारांनी बजावलेल्या भूमिकेमुळे आगामी विधानसभा निवडणुकीत स्थानिक उमेदवार देण्याऐवजी शहरी भागातील निवडून येण्याची शमता असलेला उमेदवार रींगणात उतरवण्याची रणनीती राजकीय पक्ष अखण्याची शक्यता असल्याने तिकीट मिळवण्यासाठी इच्छुक कामाला लागले आहेत.

# मोकाट गुरांच्या मृत्यूत वाढ

**रसायनी :** मोहोपाडा नवीन पोसरी बाजारपेठेत म ोकाट फिरणाऱ्या गुरांची संख्या वाढल्याने या गुरांसाठी गोशाला बांधून तेथे गुरांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी बजरंग दलाच्या गोरक्षकांसह नागरिक करत आहेत. नुकतेच बाजारपेठेत मोकाट गुरांमधील एक गाय चक्कर येऊन धडपडत चालत असल्याचे जनार्दन गायकवाड यांनी रसायनीचे गोरक्षक प्रमुख मल्लेश गुडसे व प्रशांत तांबोळी यांना सांगितले.

# सुनील गायकवाडांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ममदापूर येथील नेरळ विद्या मंदिर शाळेचे सर्वात जेष्ठ शिक्षक सुनील यशवंत गायकवाड यांचे रात्री झोपेत हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, सुनील गायकवाड यांच्या रूपाने त्यांच्या कुटुंबातील तीन भावांचा एका वर्षाच्या आत मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



सुनील यशवंत गायकवाड हे नेरळ कर्जत रस्त्यावरील आसल या गावातील रहिवासी होते. भारतीय बोद्ध सभा या संघटनेत धर्म प्रसारकाचे कार्य अनेक वर्षे करीत होते.डी एड पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांना नेरळ विद्या मंदिर शाळेत नोकरी मिळाली होती आणि ते गेली ३५ वर्षे शिक्षक म्हणून सेवा देत होते. नेरळ येथे त्यांचे सध्या वास्तव्य होते आणि २० सप्टेंबरच्या रात्री झोपेत त्यांचे हृदयविकाराचा झटक्याने मृत्यू झाला. सुनील यशवंत गायकवाड हे डी एड, बीए बी एड तसेच एलएलएमपर्यंत शिक्षण पूर्ण झाले असून, नेरळ विद्या मंदिर शाळेत ते वयाने सर्वात ज्येष्ठ शिक्षक होते.

यशवंत गायकवाड यांचे पुत्र पत्रकार तसेच नेरळ ग्रामपंचायतीमध्ये सदस्य असलेले धर्मानंद गायकवाड यांचा नोव्हेंबर २०२३ मध्ये मृत्यू झाला होता, तर धर्मानंद यांचे मोठे भाऊ हॉटेल व्यवसाय पाहणारे दिनेश गायकवाड यांचा मे २०२४ मध्ये आणि आता सुनील गायकवाड यांचा हृदयविकाराचा झटका आल्याने मृत्यू झाला आहे. या कुटुंबातील चारही विवाहित पुरुष यांचे आकस्मिक मृत्यू झाले आहेत. सिद्धार्थ यशवंत गायकवाड हे १५ वर्षांपूर्वी स्वर्गवासी झाले होते.

# खांदा वसाहतीत वाढले डेंग्यूचे रुग्ण, नागरिक भयभीत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खांदा वसाहतीमध्ये डेंग्यूची साथ पसरत असून, मोठ्या प्रमाणावर रुग्ण सापडत आहेत. डेंग्यूचा पांढरा डास भरदिवसा दिसत असून, त्याची उपत्ती वाढत आहे. वातावरणात बदल होत असल्याने नागरिक उष्मा हैराण झाले असून, सर्दी खोकला आजार बळावत आहे. त्यामध्ये खांदा वसाहत डासांचे प्रमाण वाढत असल्याने त्यामध्ये डेंग्यू डास चावल्याने खांदा वसाहतीमधील खासगी रुग्णालयामध्ये डेंग्यूचे रुग्ण वाढत आहेत.

डेंग्यूमधून बरे होण्याकरिता खासगी रुग्णालयामध्ये मोठे आर्थिक बिल द्यावे लागत आहे. पनवेल महानगरपालिकेने डासाची फवारणी सकाळी आणि संध्याकाळी करावी, अशी मागणी खांदा वसाहतीमधील नागरिक करत आहे, तसेच प्रत्येक सोसायटीमध्ये डेंग्यूची सर्वे चाचणी करावी, त्याच्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे. घरातील माणसी दोन किंवा तीन नागरिकांना डेंग्यू होत असून, या घटना खांदा वसाहतीमध्ये होत आहेत. वाढलेली झुडुपे काढण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

# इशिका शेलारांचा भारत गौरव पुरस्काराने सन्मान

**। रसायनी । वार्ताहर ।**

सामाजिक कार्य करणाऱ्या, समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या व समाजातील विविध घटकांसाठी अहोरात्र मेहनत करणाऱ्या इशिका शेलार यांना भारत गौरव पुरस्कार हॉटेल ताज येथे एका भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

कोरोना काळात मृत झालेल्या मृतांचे अंत्यविधी करणारी रायगड जिल्ह्यातील पहिली महिला, रुग्णांना व नातेवाईकांना सहज सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून निःशुल्क जेवणाचे डबे पुरवताना महत्त्वाची भूमिका, तर संपूर्ण महाराष्ट्रात आगळीवेगळी ठरलेली वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी चालवलेली निसर्ग शाळा ही समाजासाठी मैलाचा दगड ठरलेला आहे. सहज संस्थेच्या माध्यमातून सलग चार वर्षे पार पडलेले जोडप्यांचे सामुदायिक विवाह सोहळे, खोपोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात सहा वर्षांपासून पुरविण्यात येणारे दोन वेळचे निःशुल्क भोजन व खोपोली परिसरात अंतिम विधीसाठी उपलब्ध असणारी स्वर्गरथ सेवा चालविण्यात त्यांचा महत्वाचा भाग आहे. लैंगिक शिक्षणाचे व सायबर क्राईमचे धडे तसेच आदिवासी समुपदेशन, सम ाज जागृती याशिवाय सहज सेवेचे चालणारे सामाजिक उपक्रम हे समाजाचे ऋण मानून काम केले आहे. शिक्षक दिनाचे औचित्य साधून आ. महेंद्रशेठ थोरवे फाऊंडेशनच्या वतीने खा. बारणे, आ. महेंद्र थोरवे, शिक्षक मतदार संघाचे आ. ज्ञानेश्वर म्हात्रे तसेच पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत आदर्श शिक्षिका म्हणून सन्मान करण्यात आला.

**माणगांव येथील मे. प्रथम वर्ग दिवाणी न्यायाधिश सो. यांचे कोर्टात**

क्रि.चौ.अर्ज क्र. ४९/२०२४

श्री. मधुकर नथूराम मांगले ... अर्जदार नि ०७/ड
विरुद्ध ने.ता.२३/०९/२४
कोणीही नाही

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार हे मौजे मौजे महागांव, पो. महागांव, तळा, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत.

अर्जदार यांची बहीण दि. ०१/०५/२०२३ (एक मे दोन हजार तेवीस) रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे अर्जदार हे कै. लिलाबाई तुकाराम अडसूळे यांना कायदेशीर वारस असून अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात वारस नोंद करणेसाठी वारस दाखला आवश्यक आहे.

अर्जदार यांना बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस म्हणून घोषित करणेत यावे व तसा वारस दाखला मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यामुळे सदर अर्जास कोणाचीही हरकत अगर अडथळा असल्यास ही नोटीस प्रसि झाल्यापासून ०१ महिन्याचे आत या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै. लिलाबाई तुकाराम अडसूळे यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला देणेत येईल.

कळावे.
माणगांव
दि.१६/०८/२०२४

सह. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर
माणगाव - रायगड

## पान १ वरून

### कांदळवन प्रकल्पाला हरताळ?

घेतले जातात. जिल्ह्यात कांदळवनांचे संवर्धन करण्याबाबत जिल्हा प्रशासनाने चार वर्षांपूर्वीच पावले टाकली आहेत. अलिबाग तालुक्यातील वरसोली येथे पाच हेक्टर आणि तळा तालुक्यातील मांदाड येथे दहा हेक्टर अशा एकूण १५ हेक्टर जागेत कांदळवन उभारण्यात येणार आहे. तब्बल ५२ लाख ३५ हजार रुपयांचा प्रस्ताव राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केंद्र सरकारला मंजुरीसाठी पाठवला होता. परंतु, अद्यापही या प्रकल्पाच्या कामाला गती आली असल्याचे दिसून येत नाही.

### .. मुरूडचा विकास रखडला

यावेळी नांदगावच्या खालच्या मोहल्ल्यातील अनेक मुस्लिम तरुणांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यांचे त्यांनी पक्षाच्यावतीने स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंडिया आघाडीचे मुरुड तालुका प्रमुख अस्लम हलडे यांनी केले. याप्रसंगी नांदगावच्या ग्रामपंचायत सदस्या मंजुम आप्पा घोले, रिझवान फहीम यांनी आपले विचार मांडले. मेळाव्याला तुकाराम पाटील, मनोहर बैले, चंद्रकांत कमाने, राहिल कडू, इम्तियाज मलबारी, वामन चुनेकर, सरपंच हिरकणी गिदी, सरोज दिवेकर, नौशाद मुजावर, उमेश कासार, सुदेश घुमकर, इस्माईल शेख आदींसह मुस्लिम महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### साखर चौथच्या गणरायाला निरोप

मनोभावे सेवा केल्यानंतर रविवारी सायंकाळी बाप्पाला निरोप देण्यात आला. काहींनी डोक्यावर, गाडीतून बाप्पाची वाजत गाजत मिरवणूक काढली. वेगवेगळ्या गाण्यांच्या ठेक्यावर नाचत बाप्पाच्या मिरवणुकीत अनेक जण सहभागी झाले होते. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोषदेखील करण्यात आला. सायंकाळी पाचनंतर मिरवणुकीला सुरुवात झाली. काहींनी पारंपरिक पेहराव केला होता, तर काहीजण नवनवीन कपडे परिधान करून मिरवणुकीमध्ये सामील झाले होते. मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला. वाहतूक कोंडी होऊ नये यासाठीदेखील वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले होते. रात्री दहा वाजेपर्यंत मिरवणूक झाल्यानंतर गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. बाप्पाला निरोप देताना अनेकांचे डोळे पाणावले होते.

**कर्णकर्कश आवाजामुळे ध्वनीप्रदूषण होते. त्यामुळे यावर्षी या आवाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये आवाज नियंत्रण मशीन दिले आहे. क्षमतेपेक्षा अधिक आवाज असलेल्या वाद्यांवर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे.**

**- सोमनाथ घार्गे,**
**पोलीस अधीक्षक, रायगड**

### डिझेलतस्करीची केंद्राने घेतली दखल

राजकीय नेते यांचेही पाठबळ असल्याने डिझेल तस्करीचे प्रकार दिवसरात्र सुरु असल्याचे दिसून येते. यातून सागरी सुरक्षेला धोका असल्याने संजय सावंत यांनी केंद्र शासनास पत्र पाठवून चौकशी करण्याची मागणी केली होती. याची दखल घेत केंद्र शासनाने राज्य शासनाच्या साम ान्य प्रशासन विभागाचे उपसचिव दीपक बळीराम मोरे यांना पत्र पाठवून चौकशीची प्रक्रिया सुरु केली आहे. डिझेल तस्करीमुळे मच्छिमारांची जाळी तुटणे, बोटींना अडथळा आणणे, गोरगरीब मच्छिमारांना मारहाण करण्याची धमकी देणे असे प्रकार सर्रास होत असून, या तस्करांविरूद्ध अनेक प्रकारच्या कारवाया पोलीस तसेच तटरक्षक दलाने करूनही डिझेल तस्करांचे काळे धंदे बंद होत नसल्याने याप्रकरणी केंद्र सरकारने दखल घेऊन मच्छिमारांना न्याय मिळवून द्यावा, तसेच डिझेल तस्करी कायमची बंद होण्यासाठी सीबीआयकडे या प्रकरणाचा तपास सुपूर्द करावा, अशी म ागणी संजय सावंत यांनी केंद्रीय गृहखात्याला पत्र पाठवून केली होती. सावंत यांनी केंद्राला लिहिलेल्या पत्रामध्ये कोकण किनारपट्टीवरील सर्व बंदरांवर सीसीटीव्ही लावल्यास या डिझेल तस्करी करणाऱ्या टोळ्या पकडल्या जातील, अशी आशा आहे. त्यामुळे केंद्राच्या किंवा राज्याच्या गृहखात्याने कोकण किनारपट्टीवरील सर्व बंदरांवर सीसीटीव्ही लावणे अपरिहार्य करणे आवश्यक आहे.

रायगड जिल्ह्यातील समुद्राला येऊन मिळणाऱ्या खाड्यामध्ये बेकायदेशीर चालत असलेल्या डिझेल तस्करांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती समाजाच्यावतीने सावंत यांनी केली आहे. यापूर्वी तस्करांच्या या टोळीवर यलो गेट पोलीस ठाणे मुंबई, डिझेल तस्करी अंतर्गत मोक्का कायद्याद्वारे कारवाई करण्यात आली होती. त्या गुन्ह्यात या टोळीतील लोक अटक होते. त्यानंतर मोक्का कोर्टाने त्याचा जामीन मंजूर केला होता. जामिनामध्ये त्यांना रायगड जिल्ह्यात जाऊ नये, डिझेल तस्करी करू नये, अशा अटी घातल्या होत्या, असे सावत यांनी नमूद केले आहे. परंतु, या अटी या टोळीने मानल्या नाहीत. उलट, त्यानंतर याच टोळीने पुन्हा रायगड जिल्ह्यातील खाडीलगत असणाऱ्या किनाऱ्यांवर तसेच समुद्रामध्ये डिझेल तस्करीचा बेकायदेशीर धंदा खुलेआम सुरु केला आहे. तसेच राजकीय नेते व स्थानिक अधिकाऱ्यांबरोबर हातमिळवणी करुन डिझेलचा काळा बाजार पुन्हा सुरु केला आहे. तसेच या टोळीवर पेण दादरी सागर पोलीस ठाणे पेण, अंतर्गत त्यांच्यावर डिझेल तस्करी गुन्ह्याची नोंद झाली असून, त्यांना मुंबई येथून अटक झाली होती. त्यानंतर रायगडमधील रेवदंडा पोलिस ठाणे, तरणखोप पोलिस ठाणे पेण, यांच्या अंतर्गतसुद्धा डिझेल तसकरीच्या गुन्ह्याची नोंद आहे. सद्यःस्थितीत रायगडमध्ये या टोळीवर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात डिझेल तसकरीच्या गुन्ह्याची नोंद आहे. तरी पण ही टोळी खुलेआम फिरत आहे. व बेकायदेशीर डिझेलचा धंदा करीत असून, त्यांच्यावर कारवाई होऊनसुद्धा त्यांना अटक झालेली नाही. हे बेकायदेशीर डिझेल तस्कर समुद्रामध्ये व खाडीमध्ये मच्छिमार करणाऱ्या मोठ्या बोटमालकांना कमी भावाने डिझेल देतात. त्यामुळे स्थानिक मच्छिमारी सोसायटीचे डिझेल कोणी घेत नसून सोसायटी नुकसानात आहे व शासनाचा महसुल मोठ्या प्रमाणात बुडत आहे. तरी या डिझेल तस्कराच्या टोळीवर आपल्या कार्यालयामार्फत त्यांचे जामीन रद्द व्हावे व यांच्यावर कठोरात काठोर कार्यवाही व्हावी. हा बेकायदेशीर डिझेलचा काळा व्यापार बंद करण्यात यावा. तसेच या डिझेल तसकरांच्या टोळीचा तपास सीबीआयकडे द्यावा, अशी विनंती सावंत यांनी केली आहे.

### बांबू लागवडीचे उद्दिष्ट अपूर्णच

बांबू लागवड केल्यास जमिनीची धूप रोखली जाईल. यातून दरडीचा धोका टाळण्यास मदत होईल, या उद्देशाने डोंगर भागासह मोकळ्या जागेत बांबूची रोपे लावण्याचा निर्णय घेतला.

गतवर्षापासून जिल्ह्यातील गावे, वाड्यांच्या भागात बांबुची लागवड करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. तालुका, ग्रामपंचायत स्तरावर स्वयंसेवी संस्था, स्वदेश फाऊंडेशन, रोटरी क्लब, लायन्स क्लब, स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसहाय्यता बचत गटातील महिला, गावातील महिला मंडळे, भजनी मंडळे व युवक यांचा बांबू लागवडीसाठी लोकसहभाग घेतला. जिल्ह्यात सुमारे आठ लाख बांबूची बेटे तयार करण्याची तयारी दाखविली. सुरुवातीला महाडमध्ये बांबूची लागवड करण्यास सुरुवात केली. परंतु, आतापर्यंत फक्त दोन लाख बांबूची लागवड करण्यास जिल्हा परिषद यशस्वी ठरली असल्याची माहिती समोर येत आहे. त्यात ग्रामपंचायतीकडून ८७ हेक्टर क्षेत्रामध्ये ८० हजार बांबूची लागवड केल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. जिल्ह्यात बांबू लागवडीचे उद्दिष्ट जिल्हा परिषद कधी पूर्ण करणार, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

### वाहतूक पोलीस 'टार्गेट'वर

या वाहतूक शाखेमार्फत बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न कारवाईच्या माध्यमातून केला जातो. पोलीस निरीक्षक कारवाईचा आढावा नेहमी घेत असतात. दंडात्मक कारवाई करण्यासाठी प्रत्येक वाहतूक पोलिसांना एक मशीन दिली आहे. या मशीनद्वारे फोटो काढून ऑनलाईन दंडात्मक कारवाई केली जाते. परंतु, अलिबागसह काही पोलीस ठाण्यातील हद्दीतील वाहतूक पोलिसांनी फक्त एकच टक्के ऑनलाईन दंडात्मक कारवाई केल्याचा ठपका वरिष्ठांनी ठेवला आहे. प्रत्येक मशीनद्वारे दहा जणांवर कारवाई करावे, अशा सूचना असतानाही ही कारवाई समाधानकारक दिसून आली नाही. त्यामुळे काही वाहतूक पोलिसांच्या कारवाईबाबत वरिष्ठांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती खात्रीशीर सूत्रांकडून उपलब्ध झाली आहे. त्यामुळे वाहतूक पोलीस कर्मचारी टार्गेट पूर्ण करण्यासाठी कामाला लागले आहेत. वाहतूक पोलीस वरिष्ठांच्या टार्गेटवर आल्याने कर्मचाऱ्यांची कारवाईसाठी धावाधाव सुरु झाली आहे. प्रत्येकजण टार्गेट पूर्ण करण्यासाठी नाक्या-नाक्यावर उभे राहून चालकांविरोधात कारवाई करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या कारवाईबाबत अनेकांकडून नाराजीचे सूर उमटत आहेत.

### ... गावली जाल्यान

असून, जास्तीत जास्त नौका कोळंबीची मासेमारी करण्यासाठी समुद्रात दाखल होत असल्याचे मच्छिमारांकडून सांगण्यात आले.

या हंगामात कोळंबी किनाऱ्यावर मिळत असल्याने बोटींचा डिझेल खर्च कमी होतो. आगामी नवरात्रोत्सवापर्यंत मोठ्या प्रमाणात कोळंबीची मिळाली तर तिचे सोडे काढण्याकडे कोळी बांधवांचा कल असल्याचे मच्छिमारांनी सांगितले. सध्या मुरुडच्या किनारी मोठ्या प्रमाणात कोळंबीचे ढीगच्या ढीग दिसून येत असून, सोडे काढण्यासाठी महिलांची बंदरांवर लगबग सुरू असल्याचे चित्र आहे.

पद्मजलदुर्गच्या उथळ समुद्रपरिसरात कोळंबी मोठ्या प्रमाणात येत असल्याने एकदरा, राजपुरीच्या नौका मोहिमेवर दिवसातून दोन वेळा जाताना दिसून येत आहेत. टायनी, चैती, सोलट अशा प्रकारातील कोळंबी कमी-अधिक प्रमाणात जाळ्यात मिळत असल्याचे राजपुरी येथील मच्छिमार धनंजय गिदी यांनी सांगितले. बोंबिल फारसे मिळत नाही असे दिसून आले. शेलबेल, मिक्स निवडदेखील भरपूर मिळाल्याचे मच्छिमारांनी सांगितले.

संकष्टीनंतर येथे समुद्रात भांग लागत असल्याने बोंबिल अजिबात मिळत नाहीत. समुद्राला उधाण आल्यानंतर बोंबील जाळ्यात मिळतात, अशी माहिती धनंजय गिदी यांनी दिली. लाल रंगाच्या टायनी कोळंबीला मार्केटमध्ये फारसा भाव मिळत नाही. नौकांचे डिझेलचा खर्च जेमतेम सुटत असतो, अशी माहिती एकदरा येथील रोहन निशानदार यांनी दिली. सोलट कोळंबी मिळाली तर अधिक फायदा होत असतो; मात्र मिळेलच याची खात्री नसते, असेदेखील त्यांनी स्पस्ट केले.

**जाहीर निविदा** **नोटीस बोर्ड प्रसिद्धी १९/०९/२०२४**

ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु.ता. माणगाव, जि. रायगड यांजकडून सन २०२४/२०२५ वर्षाकरीता १५ वा वित्त आयोग/ग्रा.पं. फंड योजनांतर्गत खालील कामांच्या/साहित्य पुरवठ्याच्या निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव/साहित्याचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फॉर्म फी | १% इसारा रक्कम | निविदा मिळणेची तारीख | निविदा उघडण्याची तारीख | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंबेवाडी सार्व. विहीर दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | २००/- | ५००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| २ | रा.जि.प. शाळा आदिवासीवाडी साठवण टाकी, नळजोडणी इतर | १५ वा वित्त आयोग | ५०६३०/- | २००/- | ५०६/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ३ | पळसगाव बु. विहीर दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ६००००/- | २००/- | ६००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ४ | रा.जि.प. शाळा पळसगाव बु. आदिवासीवाडीकरीता नळजोडणी | १५ वा वित्त आयोग | १२०००/- | २००/- | १२०/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ५ | ग्रामपंचायत कार्यालय इमारतीकरीता रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे. | १५ वा वित्त आयोग | १२०००/- | २००/- | १२०/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ६ | प्राथ. शाळा पळसगाव बु. इमारतीकरीता रेनवाटर हार्वेस्टिंग करणे. | १५ वा वित्त आयोग | १२०००/- | २००/- | १२०/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ७ | अंगणवाडी पळसगाव बु. इमारतीकरीता रेनवाटर हार्वेस्टिंग करणे. | १५ वा वित्त आयोग | १२०००/- | २००/- | १२०/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ८ | रोहिदासवाडी ते महादेव देवळे घरापर्यंत रस्ता | ग्रा.प. फंड | १०००००/- | २००/- | १०००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ९ | प्राथ. शाळा घरोशीवाडी शौचालय दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ४९०००/- | २००/- | ४९०/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १० | घरोशी येथे गटार व रस्ता बांधणे. | १५ वा वित्त आयोग | १०३००३/- | २००/- | १०३०/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| ११ | घरोशी येथे दामोदर म्हामूणकर यांचे घरापासून विष्णू कदम यांचे घरापर्यंत रस्ता करणे. | १५ वा वित्त आयोग /ग्रा.पं. फंड | ८५९२०/- | २००/- | ३५९/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १२ | रोहिदासवाडी चावडी दुरूस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग /ग्रा.पं. फंड | १०००००/- | २००/- | ५००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १३ | पळसगाव बु. आदिवासीवाडी प्राथ. शाळा वर्गखोलीस लादी बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ३००००/- | २००/- | ३००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १४ | ग्रामपंचायत कार्यालय इमारत सुशोभिकरण करणे. | १५ वा वित्त आयोग /ग्रा.पं. फंड | १०००००/- | २००/- | १०००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १५ | आरोग्य उपकेंद्र इमारतीसाठी संरक्षक कुंपण बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | २००/- | ५००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १६ | आंब्रेवाडी स्मशानभूमी रस्त्याला सांडपाणी व्यवस्थापनाकरीता मोरी बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ६००००/- | २००/- | ६००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १७ | पळसगाव बु. आदिवासीवाडी स्मशान चौथरा दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | ५३६५०/- | २००/- | ५३७/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |
| १८ | आदिवासीवाडी कार्यशाळा इमारत सभामंडप बांधणे. | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | २००/- | ५००/- | २०/०९/२०२४ | २७/०९/२०२४ | ६ महिने |

**अटी व शर्ती -** १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. २६/०९/२०२४ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्क्म भरणा पावती/ चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल.

## निवडक

### तरुणावर पोक्सोंतर्गत गुन्हा

**पनवेल :** अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने घरात ओढून नेण्याचा प्रयत्न करणार्‍या युवकाच्या विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या घटनेत आरोपीने पीडितेच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप ठेवण्यात आला असल्याचे पोलिसांनी सांगितले. किशोर कोनाळे असे आरोपीचे नाव आहे. पीडित अल्पवयीन मुलगी ही घराबाहेर तिच्या मैत्रिणीबरोबर खेळत होती. त्यावेळी आरोपीने तिला बोलावले, मात्र ती न आल्याने आरोपीने जबरदस्तीने स्वत:च्या घरात तिला ओढत नेण्याचा प्रयत्न केला.

### महेश साळुंखेंनी दिल्या शुभेच्छा

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल शहरातील दौरा गणपतीच्या उत्सवानिमित्त पनवेल शहरातील सर्व गौरा गणपतींना सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्यांचे स्वागत त्या त्या मंडळाच्या अध्यक्षांकडून करण्यात आले. यावेळी बोलताना लवकरच स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचा जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांचा मेळावा पनवेल येथे होणार आहे. याकरिता स्वाभिमानीचे राष्ट्रीय स्तरावरचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून लाखो रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना खांदा वसाहतीमध्ये घडली आहे. खांदा वसाहतीमधील सेक्टर ११ येथे राहणारे भूषण बेर्डे हे घराबाहेर असताना अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा मिळून जवळपास ३ लाख ५४ हजारांचा ऐवज चोरुन नेल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### पनवेलमध्ये युवतीचे अपहरण

**पनवेल :** घराखाली असलेल्या दुकानातून खाऊ घेऊन येते असे सांगून घराबाहेर पडलेल्या एका १६ वर्षीय युवतीचे अपहरण झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ती चिंचपाडा येथे राहात होती. तिचा रंग सावळा, बांधा पातळ, डोळे घारे, केस लांब असून अंगात गडद रंगाचा टॉप व निळ्या रंगाची बॅगी जिन्स घातलेली आहे. या तरुणीबाबत माहिती असल्यास पोलीस ठाण्याशी २७४५२३३३ संपर्क साधावा.

### शेवरलेट एन्जॉय गाडीची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील वडाळे तलाव परिसरातून शेवरलेट एन्जॉय गाडीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. प्रदीप पराड यांची गाडी क्र. एमएच-०४-एचएफ-०९८८ ग्रे रंगाची ही गाडी ज्याची किंमत जवळपास २ लाख २० हजार अशी असून, ही गाडी त्यांनी वडाळे तलाव परिसरात उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवमतदार ठरणार निर्णायक

■ भावी आमदाराचे भवितव्य नवमतदारांच्या हाती

■ पनवेल विधानसभा मतदारसंघात ४२,७९८ मतदारांची वाढ

**। पनवेल । वार्ताहर ।**

**भारत निवडणूक आयोगाने आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलीकडेच पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदारांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये ४२,७९८ नवमतदारांची वाढ झाली असून, हेच मतदार निर्णायक ठरणार असल्याची चर्चा सुरू आहे. या मतदारांच्या हाती आता भावी आमदारांचे भवितव्य असल्याचे बोलले जात आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघात ६ लाख ३४ हजार १९७ मतदारांची नोंद झाली आहे. या मतदारांमध्ये ३ लाख ३७ हजार ९०९ पुरुष, २ लाख ९६ हजार २१५ महिला आणि ७३ तृतीयपंथीय मतदारांचा समावेश आहे, अशी माहिती पनवेल तहसीलदार विजय पाटील यांनी दिली.**



पनवेल विधानसभा मतदारसंघात १८-१८ वयोगटातील १३ हजार २५९, २०-२९ वयोगटातील १ लाख १९ हजार ८६७, ३०-३९ वयोगटातील १ लाख ६६ हजार ५६, ४०-४९ वयोगटातील १ लाख ३८ हजार ८९४, ५०- ५९ वयोगटातील ९८ हजार ८९३, ६०-६९ वयोगटातील ६० हजार ७४९, ७०-७९ वयोगटातील २६ हजार १५० आणि ८० वर्षापेक्षा अधिक वयोगटातील १० हजार ३३८ मतदारांचा समावेश आहे. यावर्षी मे महिन्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत पनवेल विधानसभा मतदारसंघात ५ लाख ९१ हजार ३९८ मतदार होते. आता निवडणूक आयोगाने सुरु केलेल्या विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रमानंतर या मतदारांमध्ये ४२ हजार ७९८ मतदारांची वाढ झाली आहे. त्यामुळे पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदारांची संख्या ६ लाख ३४ हजार १९७ इतकी झाली आहे.

> "मतदारयादीच्या विशेष पुनर्रिक्षण कार्यक्रमांतर्गत पनवेल विधानसभा मतदारसंघाची नवीन प्रारुप मतदारयादी नुकतीच प्रसिध्द झाली आहे. मतदारांनी मतदाता सेवा पोर्टल या संकेतस्थळावर जाऊन मतदार यादीत आपले नाव तपासून सर्व तपशील योग्य आहेत का याची चौकशी करुन मतदान केंद्राची माहिती घेणे गरजेचे आहे."
>
> – विजय पाटील, तहसीलदार, पनवेल

येत्या नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलीकडेच झालेल्या मतदारांच्या संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रमात पनवेल विधानसभा मतदारसंघात ४२ हजार ७९८ नवीन मतदारांची वाढ झाली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर आता राज्य विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी तयारी सुरु केली आहे.

बुथ कमिटीपासून ते पदाधिकारीपर्यंत बदल केले जात आहेत. याशिवाय आता प्रशासकीय स्तरावरदेखील राज्य विधानसभा निवडणुकीच्या कामांना गती मिळाली आहे. त्यामुळे लवकरच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान, मतदारांनी मतदाता सेवा पोर्टल संकेतस्थळावर जाऊन आपले नाव तपासून पाहावे, असे आवाहन पनवेल तालुका तहसीलदार विजय पाटील यांनी केले आहे.

दरम्यान, नवमतदारांना आपल्याकडे आकर्षिक करुन घेण्यासाठी आता सर्वच राजकीय पक्षांकडून बांधणी करण्यात येणार आहे. त्यामुळे वाढलेला मतदारांचा आकडा महत्त्वपूर्ण ठरणार, हे मात्र नक्की.

# वेश्वी येथे आरोग्य शिबीर संपन्न



● (छायाचित्र : समीर मालोदे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

साखरचौथ गणेशोत्सवनिमित्त ओमकार क्रीडा मंडळ वेश्वी, लायन्स क्लब अलिबाग, मुंबई येथील दोस्त फाऊंडेशन, जिल्हा रुग्णालय आणि ग्रामस्थ मंडळ वेश्वी यांच्या संयुक्त विद्यमाने वेश्वी येथील मराठी शाळेत मोफत आरोग्य शिबीर, मोफत मोतीबिंदू चिकित्सा शस्त्रक्रिया याचबरोबर रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

वेश्वी ग्रामपंचायत हद्दीतील ११५ जणांनी या शिबिराचा लाभ घेतला, तर २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्‌घाटन गावातील ज्येष्ठ नागरिक विष्णू मगर आणि सदानंद शेळके यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. यावेळी गजानन नाईक, राघव गुरव, सुभाष पाटील, विद्यमान उपसरपंच आरती पाटील, सदस्य अनंत मुलूस्कर, राजन राऊळ, मृदुला मगर, जुई शेळके, रुपाली गुरव यांच्यासह सुरेश शेळके, गजानन राऊळ, कृष्णा धनवी, पद्माकर पाटील, संदीप घरत, सुरेंद्र शेळके, निलेश मगर, ओमकार क्रीडा मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाटील, सचिव गिरीश शेळके, लायन्स क्लबच्या अध्यक्षा गौरी म्हात्रे, डॉ. शीतल स्वामी, मंडळाचे सदस्य राकेश राऊळ, प्रशांत राऊळ, निकेश शेळके, अंकित शेळके, अतिष पाटील, विरेंद्र मगर, हेमंत नाईक, सुशांत नलावडे, प्रसाद मगर, केदार नलावडे, किरण गुरव, प्रतीक गुरव, पंकज गुरव, महेश मुलूस्कर, अमित मुलूस्कर, स्वप्नील शेळके, संकेत शेळके, ओमकार नलावडे, रोहित मिंडे, जितेंद्र गुरव, ग्रामस्थ मोठ्यया संख्येने उपस्थित होते.

# पोलिसांकडून विद्यार्थ्यांना संरक्षणाचे धडे

**न्हावा-शेवा पोलिसांचा कार्यक्रम**



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण, बदलापुरातील संतापजनक घटनेनंतर अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शाळेच्या विद्यार्थ्यांमध्येही लैंगिक अत्याचारापासून संरक्षणाबाबत जनजागृती करण्यासाठी न्हावा-शेवा पोलीस ठाण्याच्यावतीने शनिवारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बदलापूर येथील घटनेनंतर न्हावा-शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुम बागवान व चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी जेएनपीएच्या कामगार वसाहतील मल्टीपर्पज हॉलमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये आरकेएफ स्कूलचा शिक्षकवर्ग व पाचवी ते दहावीचे सुमारे ८०० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभागी झाले होते.

या कार्यक्रमात लैंगिक अत्याचारापासून संरक्षण याबाबत पेण येथील चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया येथील एनजीओचे डॉ. किशोर देशमुख, ॲड. शैलेश कोंडुसकर, ॲड. विवेक गोपी यांनी चिल्ड्रन्स अवेअरनेसबाबत विद्यार्थी व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले, तसेच उपनिरीक्षक लेंडे, महिला पोलीस हवालदार नाईक यांनी सायबर गुन्हे, डायल ११२, निर्भया पथक महिला सहाय्य कक्ष व महिलांच्या सुरक्षासंदर्भात माहिती दिली.

# स्वच्छतेबाबत दुटप्पीपणा नको!



● पनवेलच्या एसटी डेपोमध्ये आरटीओ विभागाने कारवाई केलेल्या अनेक गाड्या एका बाजूला अनेक वर्षांपासून धूळ खात पडून आहेत. या गाड्यांमुळे त्या ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले असून, प्रवाशांना नाक मुठीत घेऊन जावे लागते. त्याचप्रमाणे बसआगारात येणारे काही प्रवासी गाड्यांच्या आडोशाला आपला कार्यक्रम उरकून घेतात, त्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण झाली आहे. डासांचे प्रमाणाही वाढले आहे. एकीकडे स्वच्छता पंधरवडाच्या माध्यमातून स्वच्छतेचा गवगवा करणाऱ्या पालिका प्रशासनाचे याकडे लक्ष नाही, याबाबत आश्‍चर्य व्यक्त होत आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)

# आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात

**। पनवेल । वार्ताहर ।**

श्री प्रल्हाद रे झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल पत्रकार संघटना आणि आम्ही रक्तदाते पनवेलचे यांच्यातर्फे रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन आज करण्यात आले होते.

श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर विश्राळी नाका पनवेल येथे रविवारी (दि २२) सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत हे शिबीर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला आयोजक ॲड. मनोहर सचदेव, अमोल साखरे यांच्यासह संजय कदम व अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोहर सचदेव यांनी केलेल्या आवाहनाला रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आयोजक अमोल साखरे यांनीसुद्धा पनवेलकरांचे कौतुक केले.

# रघुनाथ पाटील यांचे निधन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



ढवर येथील शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते, सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय सहभाग घेणारे हरहुन्नरी, मनमिळाऊ, सर्व क्षेत्रात हिरिरीने सहभाग घेणारे रघुनाथ विष्णू पाटील यांचे सर्पदंशाने शनिवारी (दि. २१) निधन झाले. निधनसमयी ते ५९ वर्षांचे होते. त्यांच्यावर ढवर येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

रायगड जिल्ह्याला कबड्डीची पंढरी समजले जाते. त्या रायगड जिल्ह्याच्या संघाचे प्रतिनिधित्व केलेले रघुनाथ पाटील हे नूतन हनुमान क्रीडा मंडळ ढवर या संघाचेसुद्धा अध्यक्ष होते. त्यांनी अनेक क्रीडांगणे गाजवून मंडळाला अनेक बक्षिसे मिळवून दिली. कबड्डी खेळासोबत ते बैलगाडीप्रेमी, भजनप्रेमी होते.

रघुनाथ पाटील यांच्या निधनाने गावातील एक हरहुन्नरी व्यक्ती गेल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. रघुनाथ पाटील यांच्या जाण्याने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पश्‍चात एक भाऊ, बहिणी, पत्नी, एक मुलगा शुभम पाटील, दोन मुली, जावई, नातवंडे असा मोठा पाटील परिवार आहे. त्यांचे दशविधी कार्य (दहावे) सोमवार, दि. ३० सप्टेंबर रोजी सकाळी ठीक ८ वाजता ढवर येथे होणार आहेत. रघुनाथ पाटील यांच्या अंत्यविधीप्रसंगी पाटील कुटुंबिय, ग्रामस्थ, नातेवाईक, राजकीय पुढारी, बैलगाडीप्रेमी, भजनप्रेमी आदी सर्व क्षेत्रातील मान्यवर हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

# वडाले सरोवराचे संरक्षण रामभरोसे





**संरक्षण भिंतींवर काढली अश्‍लील चित्रे**

● (छायाचित्र : राजेश डांगळे)

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील प्राचीन पेशवेकालीन वडाले सरोवराचे पनवेल महानगरपालिकेने करोडो रुपये खर्च करुन सुशोभिकरण केले आहे. मात्र, शनिवारी रात्री तलावाच्या संरक्षण भिंतींवर काही समाजकंटकांकडून अश्‍लील चित्र काढून परिसर विद्रुप करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा तलावाच्या सुरक्षेबाबतचा प्रश्न पुढे आला आहे.

वडाले सरोवरावर सकाळ-संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर फेरफटका मारायला ज्येष्ठ नागरिकांपासून लहान मुले, महिला वर्ग येत असतात. आज ती सर्व काढलेली चित्र सकाळी आलेल्या नागरिक तसेच महिलांच्या दृष्टीस पडली, त्यामुळे मोठा हाहाकार माजला. त्या चित्रांवर कापड टाकून झाकण्याचा प्रयत्न तेथील सुरक्षारक्षकांनी केला. संरक्षणाकरिता असलेले रायगड सुरक्षा गार्ड होते कुठे, असा प्रश्न उभा राहिला आहे. दरम्यान, मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांनी ताबडतोब रंग आणून रायगड सुरक्षा रक्षक यांच्या निदर्शनास ही बाब आणून त्या सर्व काढलेल्या अश्‍लील चित्रांवर रंग लावण्यात आला. याठिकाणी संरक्षणाकरिता सकाळी तीन, संध्याकाळी चार तर रात्री तीन गार्ड उपलब्ध असतात. काही वेळा या ठिकाणी गांजा पिणारे मोठ्या प्रमाणावर येत असतात, तर काहीजण वाढदिवसयेथे साजरा करून कचरा येथेच सोडतात, तर सकाळी आयुर्वेदिक रस विकणारेसुद्धा आपला कचरा येथेच टाकून जात असतात. सर्व बाबीचा विचार करुन पालिका प्रशासन उपाययोजनांसाठी कोणती पावले उचलते, याकडे सर्व नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# खोपोली मार्गावर गुरांचा सुळसुळाट

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**



पाली-खोपोली मार्गावर रासळ येथे सद्य:स्थितीत मोठ्या प्रमाणात मोकाट गुरांचा सुळसुळाट असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. जणु काही या गुरांनी रस्त्यावर रास्ता रोको केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सद्य:स्थितीत पाली खोपोली हा महामार्ग चांगल्या स्थितीत असल्यामुळे या मार्गावर वाहनांची वर्दळ पाहायला मिळत आहे. अशातच या मार्गावर वाढत्या मोकाट गुरांच्या संख्येमुळे वाहनचालकांना वाहन चालवतांना अक्षरश: तारेवरची कसरत करावी लागत आहे.

या मोकाट गुरांच्या दिवसेंदिवस वाढत्या संख्येमुळे या गुरांना कोणी वाली आहे की नाही? ही गुरे रस्त्यावरती अशीच मोकाट सोडुन देण्यात आली आहेत की काय? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या मोकाट गुरांचे कळपच्या कळप रस्त्याच्या मध्येच उभे व ठाण मांडून बसलेले असतात. यांच्यामागे कोणीच गुराखी वगैरे दिसून येत नाही. तसेच वाहनचालकांना जाण्यासाठी रस्ताच मोकळा नसल्यामुळे गाडीचा हॉर्न वाजवूनसुद्धा गुरे बाजूला होत नाहीत. शेवटी वाहनचालकांना गाडी उभी करुन गाडीतून उतरुन गुरांना बाजूला करावे लागत आहेत.

## प्लास्टिकचे रिसायकलिंग, तर निर्माल्याचे खतात रूपांतर

# नियोजनबद्ध पर्यावरणस्नेही गणेशोत्सव

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

नुकतेच दीड, पाच व दहा दिवसांच्या गणरायाचे विसर्जन झाले. यावेळी रोहा तालुक्यातील रोह्यासह ३५ गावांतून जवळपास दहा टन निर्माल्य ज्यामध्ये हार, फुले दुर्वा इत्यादी वस्तूंचा समावेश आहे व साडेतीन टन प्लास्टिक जमा करण्यात आले आहे. अतिशय नियोजनबद्धरित्या पर्यावरणस्नेही गणेशोत्सव साजरा करण्यात आला.

जमा झालेले प्लास्टिक व थर्माकोलसारखे घटक बाजूला काढून राहिलेल्या निर्माल्याचे खतामध्ये रूपांतर केले जाणार आहे. तसेच प्लास्टिकचे रिसायकल प्लांटमध्ये नेऊन रिसायकलिंग प्रोसेस केली जाणार आहे.



दरम्यान, सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था रायगड, सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान, पोलीस ठाणे रोहा, दीपक नायट्रेट लिमिटेड रोहा व विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, रोहा यांच्या सौजन्याने हा गणेशोत्सव राबवण्यात आला.

### काळानुरूप बदल

गणेश उत्सव हा आपल्या अस्मितेचा परंपरेचा आणि संस्कृतीचा ठेवा आहे. भारतासह देशविदेशात पोहोचलेला गणेशोत्सव कालानुरूप बदलत आहे. मात्र आज साजरे होणारे गणेशोत्सव हे पर्यावरणाला हानिकारक तर ठरत नाहीत ना, याकडे मात्र लक्ष देऊन त्यामध्ये काळानुरूप विधायक बदल करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

### असे आहे मोहिमेचे स्वरूप

नदी, तलाव व पाण्याच्या ठिकाणी होणाऱ्या गणेश विसर्जनावेळेस त्या ठिकाणी निर्माल्य एकत्रीकरण केंद्र स्थापन करण्यात आले. यामध्ये दोन भागांमध्ये (सुके व ओले निर्माल्य) विभागले गेले. लोकांनी आपल्याकडे असलेलेले निर्माल्य तलाव, समुद्र किंवा नदीमध्ये किंवा पाण्याच्या ठिकाणी न टाकता निर्मल एकत्रीकरण केंद्रामध्ये जमा करण्यासाठी गावागावात बॅनर लावण्यात आले. तसेच समाज माध्यमांवरदेखील मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली होती. याचा परिणाम असा झाला की लोकांनी निर्माल्य कलशामध्ये निर्माल्य जमा केले. त्यानंतर हे सर्व निर्माल्य स्वयंसेवकांच्या टीम द्वारे गोळा करण्यात आले आणि विलगीकरण केले गेले आहे.

### खतनिर्मिती करून मोफत वाटप

या जमा केलेल्या निर्माल्यावर प्रक्रिया करून त्याचे सेंद्रिय खत बनवण्यात येईल. तसेच बनवल्या गेलेल्या खताचे वितरण हे पर्यावरणपूरक गणेश उत्सव उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या गावांमध्ये केले जाणार आहे.

**पर्यावरण संवर्धन**

कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे. गणेशोत्सवामधील पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षण व संवर्धन यासाठी गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा होणे ही काळाची गरज आहे. यासाठी सर्वजण एकत्र आले. प्रत्येकाने आपला दृष्टिकोन पर्यावरणस्नेही ठेवला आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणले.

# पोलीस पाटलांनी घेतली तहसीलदारांची भेट

**। रसायनी । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यात नव्याने नियुक्ती झालेले तहसीलदार अभय चव्हाण यांची खालापूर तालुकाध्यक्ष अनंत ठोंबरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली भेट घेऊन त्यांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या.

खालापूर तालुक्याला नव्याने आलेले तहसीलदार अभय चव्हाण यांची खालापूर तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली भेट घेतली. यावेळी तहसीलदार अभय चव्हाण यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी गाव पोलीस पाटील यांच्या समस्या सोडविण्याची मागणी केली. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्यासह तालुक्यातील पोलीस पाटील संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ... तर आमच्याकडे हाके

तुमच्याकडे दाऊद असेल तर आमच्याकडे अरुण गवळी आहे असे सनसनाटी उद्गार एकेकाळी बाळासाहेब ठाकरे यांनी काढले होते. पुढे जाऊन हा अरुण गवळीच ठाकरे यांच्या विरोधात गेला आणि त्याने पालिका निवडणूक लढवली. तिच्यात तो यशस्वी झाला नाही ही बाब वेगळी. आज त्या उद्गारांची आठवण यावी असे वातावरण राज्यात निर्माण झाले आहे. राखीव जागांच्या प्रश्नावरून सत्तारुढ महायुतीतच यादवी उफाळली आहे. त्यातून एकनाथ शिंदे यांच्याकडे जरांगे असतील तर आमच्याकडे ओबीसींचे नेते लक्ष्मण हाके आणि तत्सम लोक आहेत असे भाजपवाले सांगताहेत की काय असे वाटू लागले आहे. सध्या मराठा, ओबीसी आणि धनगर अशा तीन समाजांची उपोषणे वा आंदोलने चालू आहेत. या प्रश्नांमध्ये थातूरमातूर उपाय करून त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करायचा असा एकनाथ शिंदे सरकारचा डाव होता. त्या निमित्ताने विरोधकांची कोंडी व बदनामी करायची असेही त्यांचे प्रयत्न होते. पण हे कारस्थान आता त्यांच्यावरच उलटू लागले आहे. आज एकीकडे जरांगे फडणवीसांना लक्ष्य करीत आहेत. तर दुसरीकडे ओबीसी नेते एकनाथ शिंदे यांच्यावर गोळीबार करू लागले आहेत. या दोन ढोंगी सत्तारुढांचे तोंड या निमित्ताने फुटत आहे ही चांगली गोष्ट असली तरी त्यामुळे महाराष्ट्रात जो तणाव निर्माण होत आहे तो धोकादायक आहे. याचा स्फोट होऊ नये याची काळजी घ्यायला हवी. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांचे आणखी एक उपोषण गेल्या आठवड्यात सुरू झाले. हे उपोषण कितवे हे त्यांचे समर्थकच सांगू शकतील. या उपोषणांची रया बऱ्याच अंशी गेली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये पहिल्यांदा उपोषण केले तेव्हा सर्व महाराष्ट्राचे लक्ष त्याने वेधून घेतले. राज्याचे मंत्री तेथे येरझाऱ्या घालू लागले. मग त्यांनी सरकारला मुदत दिली.

### जरांगे पुरून उरले

दुसऱ्या आणि तिसऱ्या वेळी मागण्या पूर्ण मान्य झाल्याखेरीज उपोषण मागे घेणार नाही असे ते म्हणाले. नंतर मुंबईला वेढा घालण्याची भाषा त्यांनी केली. त्यावेळी सरकारची पाचावर धारण बसली. किंवा सरकारने तसे नाटक केले. सगेसोयऱ्यांसकट सर्वांना आरक्षण मिळाल्याखेरीज माघार नाही असे जरांगे म्हणाले. शेवटी तशी एक सरकारी सूचना काढले गेली. आपण मैदान मारले असा जल्लोष जरांगेंनी केला. एकनाथ शिंदेंनी त्याचे सर्व श्रेय स्वतःकडे घेतले. पण पुढे आठच दिवसात आपण फसवले गेलो हे जरांगेंना कळले. त्यामुळे संतापलेल्या जरांगेंच्या धमक्या आणि आंदोलने पुन्हा सुरू झाली. मात्र त्यांना कोणी फारशी भीक घालेना. मग त्यांनी राजकीय अस्त्र बाहेर काढले. विधानसभेच्या सर्व जागा लढवणार अशी घोषणा आधी त्यांनी केली. नंतर ते कठीण आहे हे लक्षात आले. मग आपण अनेक जागा पाडू शकतो याची जाणीव त्यांना झाली. महायुतीला सत्ता जाण्याची भीती दाखवल्याखेरीज ते सरळ होणार नाहीत हेही त्यांना कळले. मग तशी टीका सुरू झाली. त्यातही देवेंद्र फडणवीसांवर ते अधिक तुटून पडू लागले. ते तसे रास्तच आहे. कारण, फडणवीस आणि भाजपने या प्रश्नावर आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला. ओबीसींचे एकगठ्ठा मतदान आपल्यालाच होणार असा आव आणला. ओबीसींचे उपोषण सोडवायला फडणवीस गेले. जरांगेंकडे मात्र फिरकलेही नाहीत. दुसरीकडे मराठ्यांना पहिले आरक्षण भाजपनेच दिले होते असे म्हणून त्याचे श्रेय घेण्याचा त्यांचा प्रयत्न अजूनही चालू आहे. जरांगे यांनी त्यांचा हा डाव चांगला उघड पाडला. जरांगेंच्या आंदोलनात फूट पाडण्याचे उद्योगही फडणवीस सरकारने केले. गाववाल्यांना त्यांच्याविरुध्द भडकवण्याचे उपद्व्याप झाले. मध्यंतरी बीड दंगलीबाबत जरांगेंविरुध्द गुन्हा आणि एसआयटी चौकशीची घोषणा केली गेली. पण या सर्वांना जरांगे आणि त्यांचे आंदोलन पुरून उरले यात शंकाच नाही.

### ओबीसींचा शिंदेंवर गोळीबार

असे असले तरी जरांगे यांचे सर्वच म्हणणे बरोबर होते असे नव्हे. त्यांनी आपल्या मागण्या सतत बदलल्या. आरंभी मराठवाड्यातील कुणबी नोंदी असलेल्यांना आरक्षण मिळावे असे म्हणत होते. नंतर सर्वच मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळायला हवे असा हेका त्यांनी धरला. नंतर ओबीसी वर्गातूनच हे आरक्षण मिळावे असा दावा त्यांनी सुरू केला. मराठा आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना यावर आता कोणताही निर्णय घेणे सरकारला अशक्य आहे. मात्र जरांगे यांना हे मान्य नाही. त्यांचा आग्रह चालूच आहे. यामुळे ओबीसी समाजात कमालीचा असंतोष निर्माण झाला आहे. मराठा वाटेकरी वाढले तर आपले आरक्षण कमी होणार हे त्यांना दिसते आहे. त्यामुळे आता त्यांच्यातले पुढारी सरसावले. लक्ष्मण हाके जरांगेंना प्रत्युत्तर म्हणून त्यांच्या गावाजवळच उपोषण करीत आहेत. त्यांना फडणवीसांच्या भाजपची फूस असावी असे मानायला भरपूर जागा आहे. हाके यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर विखारी टीका सुरू केली आहे. एकनाथ शिंदे हे दोन नंबरचे धंदे करणाऱ्यांना संरक्षण देणारे असून उमेदवारी देण्यासाठी ते वीस-वीस कोटींची मागणी करीत आहेत असा घणाघात हाके यांनी शुक्रवारी केला. ओबीसी शब्दही न उच्चारणाऱ्या या मुख्यमंत्र्यांची आपल्याला लाज वाटते असेही ते म्हणाले. यामुळे जरांगे आणि हाके यांच्याआडून शिंदे आणि भाजप गटाची ही लढाई सुरू आहे की काय असा प्रश्न आहे. यातच धनगर समाजाने आदिवासी गटात समावेश होण्यासाठी पुन्हा उचल खाल्ली आहे. एकेकाळी सत्तेवर येताच पहिला निर्णय धनगर आरक्षणाचा होईल असे देवेंद्रांनी सांगितले होते व मते घेतली होती. त्याला दहा वर्षे लोटली. आता याबाबत त्यांची बोलती बंद आहे. दुसरीकडे धनगरांना आरक्षण देण्याविरोधात आदिवासींनी आंदोलनाची धमकी दिली आहे. निवडणुकीच्या तोंडावर यातून जातीय तणाव निर्माण होऊ शकतो. शिंदे आणि फडणवीसांना यातही निव्वळ राजकीय हिशेब दिसत असतील तर ते धोकादायक आहे.

विचार

# रेल्वे घातपातांमागे पाक दहशतवादी

**_देशात गेल्या ४० दिवसांमध्ये झालेले रेल्वे अपघात हे अपघात नसून रेल्वे यंत्रणा विस्कळीत करण्याच्या षडयंत्राचा पद्धतशीर भाग आहेत. त्यामागे पाकिस्तानी दहशतवाद्यांचा हात आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा, केंद्रीय अन्वेषण विभाग, दहशतवादविरोधी पथक आणि वेगवेगळ्या राज्यांच्या तपास यंत्रणांचा हा निष्कर्ष असून सामान्य प्रवाशांची जीवनरेखा समजली जाणारी रेल्वेची यंत्रणा आता अतिरेक्यांच्या रडारवर आली आहे._**



**अजय तिवारी**

तीन युद्ध आणि 'प्रॉक्सी वॉर'मधून हाती काहीच न लागल्याने आता पाकपुरस्कृत दहशतवादी सुरक्षेच्या दृष्टीने काहीशा दुर्लक्षित असलेल्या रेल्वेच्या मागे लागले आहे. गेल्या ४० दिवसांमध्ये रुळांवरून रेल्वेगाड्या घसरण्याच्या घटना या अपघात नाहीत, तर नियोजनबद्ध षडयंत्राचा भाग आहेत. वेगवेगळ्या घटनांचा तपास आणि त्यातील काही धागेदोरे जुळवल्यास त्यात पाकिस्तानी गुप्तहेर संस्थेचा आशीर्वाद असलेल्या अतिरेकी संघटनांचा कसा हात आहे, हे उघड होते आहे. सध्या रेल्वे रुळावरील गाड्या उलटवण्याचे मोठे षडयंत्र सुरू असल्याची उदाहरणे समोर आली आहेत. गेल्या ४० दिवसांमध्ये अशा १८ घटना उघडकीस आल्या आहेत. कधी गॅस सिलेंडर, कधी सायकल, कधी दगड तर कधी लोखंडी रॉड रेल्वे रुळांवर सापडले आहेत. हा धोका मोठा आहे. देशातील बहुतांश लोक स्वस्त आणि सुलभ प्रवास म्हणून रेल्वेची निवड करतात. जम्मू-काश्मीरमध्ये लोकसभेच्या निवडणुका अतिशय सुरळीत पार पडल्या. आता विधानसभेच्या निवडणुकीत तिथे काहीच करता येत नसल्यामुळे अन्य ठिकाणांना लक्ष्य करण्यावर दहशतवाद्यांचा भर आहे. भारतीय रेल्वेचे नेटवर्क जगात मोठे आहे; अ परंतु सुरक्षितेच्या दृष्टीने त्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. त्याचा फायदा दहशतवाद्यांनी उचललेला दिसतो. रेल्वेगाड्या रुळावरून घसरण्याचे प्रमाण अगोदरच जास्त आहे. जुने रूळ, देखभाल दुरुस्तीकडे पुरेसे लक्ष नसणे आदी कारणे त्यामागे होती. आता त्यात दहशतवाद्यांच्या षडयंत्रांची भर पडली आहे. सरकारने पायाभूत सुविधा वाढवण्याकडे लक्ष दिले असले, तरी लोकांच्या मागण्या आणि रेल्वेच्या वाट्याला येणारा निधी याचे प्रमाण व्यस्त असल्याचा फटका रेल्वेच्या सुरक्षेला बसत आहे.

रेल्वे ही सामान्यांची गरज आहे. लाखो लोक रेल्वेने प्रवास करत असतात. पूर्वी दहशतवाद्यांनी शहरी उपनगरी सेवांना लक्ष्य केले होते. बॉंबस्फोट घडवून आणले जात होते. आता दहशतवाद्यांनी शहरांपासून दूर आणि दुर्गम भागातील रेल्वेरुळांवर वेगवेगळ्या वस्तू ठेवून ट्रेन रुळावरून घसरतील, मोठे अपघात होतील, अशी घातपाती कृत्ये करण्यावर भर दिला आहे. सुदैवाने अशा स्वरुपाच्या १८-२० घटनांमध्ये मोठे नुकसान झाले नाही. रेल्वे रुळांवर वेगवेगळे सामान सापडण्याच्या घटना विशिष्ट शहरांमध्ये किंवा राज्यांमध्येच घडल्या आहेत, असे नाही. अशा घटना उत्तर प्रदेशपासून ओडिशापर्यंत आणि तेलंगणापासून मध्य प्रदेशपर्यंत सर्वत्र घडल्या आहेत. कानपूरपाठोपाठ अलिकडेच राजस्थानच्या अजमेर जिल्ह्यात ट्रेन रुळावरून घसरवण्याचा कट उघडकीस आला. दहशतवाद्यांनी अजमेरजवळ सरधना आणि बांगर ग्राम रेल्वे स्थानकादरम्यान दोन ठिकाणी रेल्वेरुळांवर ७० किलो वजनाचे सिमेंटचे ब्लॉक्स ठेवले. सुदैवाने ते तोडत ट्रेन पुढे गेली आणि कोणताही अपघात झाला नाही. राजस्थानमध्ये रेल्वे रुळावरून घसरवण्याचा हा कट तिसऱ्यांदा रचला गेला. एक मालगाडी फुलेराहून अहमदाबादकडे जात असताना ही घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशनच्या माहितीनुसार ८ सप्टेंबर रोजी रात्री रेल्वेरुळांवर सिमेंट ब्लॉक टाकण्यात आल्याची माहिती मिळाली. एक किलोमीटर पुढे दुसरा सिमेंट ब्लॉक तोडून रुळावर ठेवण्यात आला होता. हे दोन ब्लॉक वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आले होते. 'डीएफसीसी' आणि रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) यांनी एकत्रितपणे सारधना ते बांगर ग्राम स्थानकापर्यंत गस्त घातली. कानपूरच्या बिल्हौरजवळ कालिंदी एक्स्प्रेस रुळावरून उतरवण्याच्या कटामागे 'इसिस' या दहशतवादी संघटनेच्या खोरासन मॉड्यूलचा हात असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. यासाठी 'आयबी', 'एनआयए', 'एटीएस'सह अनेक तपास यंत्रणांनी कानपूरमध्ये तळ ठोकला असून कटाशी संबंधित प्रत्येक घटकाची कसून चौकशी केली जात आहे. कानपूरमध्ये गेल्या एका महिन्यात रेल्वे ट्रॅकला नुकसान करून ट्रेन रुळावरून उतरवण्याचे दोन कट उघडकीस आल्यानंतर खोरासान मॉड्यूल संशयाच्या भोवऱ्यात आहे. या मॉड्यूलने २०१७ मध्ये भोपाळ रेल्वे स्थानकावर पॅसेंजरमध्ये टाईम बॉम्ब ठेवला होता. त्याचा स्फोट होऊन अनेक प्रवासी जखमी झाले होते. यानंतर तेलंगणा 'एटीएस'च्या गुप्त माहितीवरून उत्तर प्रदेश 'एटीएस'ने मॉड्यूल सदस्य सैफुल्लाला लखनऊमध्ये चकमकीत ठार केले. त्याच्याकडे सिलेंडर बॉम्ब बनवण्याचे साहित्य आणि 'आयईडी' आदी साहित्य सापडले. २०१७ मध्ये भोपाळ-इंदूर एक्स्प्रेसला कानपूरजवळ पुखरायन येथे अशाच प्रकारे लक्ष्य करण्यात आले होते. त्याच्या तपासात 'आयईडी'च्या वापराचे संकेत मिळाले. यासंदर्भात शमशुलहुदा या अतिरेक्याचे नाव समोर आले. तो 'आयएसआय'च्या सूचनेनुसार काम करत होता.

दुसऱ्या एका घातपाती कटामध्ये शिवराजपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुदेरी गावाजवळ रेल्वे ट्रॅकवर ठेवलेल्या एलपीजी सिलिंडरला कालिंदी एक्सप्रेस धडकली. यामुळे मोठा स्फोट झाला. या एक्सप्रेसच्या चालकाला दूरवरून रुळावर सिलेंडर दिसला. त्याने इमर्जन्सी ब्रेक लावून ट्रेन थांबवली. मात्र तोपर्यंत तिने सिलेंडरला धडक दिली होती. सिलेंडर लांबपर्यंत घासत गेले. सुदैवाने सिलेंडरचे झाकण उघडले नाही. सिलेंडरशिवाय रेल्वेरुळांवर पेट्रोल भरलेल्या बाटल्या, काडेपेटी, मिठाईचा बॉक्स आणि एक बॅग सापडली. बॅगेत स्फोटकासारखा पदार्थ आढळून आला. या संदर्भात तपास यंत्रणांनी आतापर्यंत २१९ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज गोळा केले असून शंभरहून अधिक लोकांची चौकशी करुन बाराजणांना ताब्यात घेतले आहे. तपास यंत्रणा श्वान पथकासह शोधमोहीम राबवत असताना, घटनास्थळाजवळील झुडपात स्निफर कुत्रा घुसला. रेल्वेरुळावरून घसरवण्याचा कट झुडपात लपून रचला गेला असावा, असा संशय आहे. ट्रेनला धडकल्यानंतर गॅस सिलिंडरचा स्फोट झाला असता तर मोठी दुर्घटना घडली असती आणि ही ट्रेन मोठ्या कटाचा बळी ठरली असती. या घटनेमागे मोठ्या कटाची शक्यता असल्यामुळेच सरकारने तपास 'एनआयए'कडे सोपवला आहे

२३ ऑगस्ट रोजी पाली येथे अहमदाबाद-जोधपूर वंदे भारत ट्रेन ट्रॅकवरच्या सिमेंट ब्लॉकला धडकली होती; मात्र या घटनेत कोणतीही जीवित वा वित्तहानी झाली नाही. २८ ऑगस्ट रोजी बरन जिल्ह्यातील छाबरा येथे मालगाडीच्या ट्रॅकवर भंगार फेकण्यात आले होते. उत्तर प्रदेशमधील लखनऊ विभागातील लालगोपालगंज स्टेशनजवळ रेल्वे ट्रॅकवर एक सायकल आणि गॅस सिलिंडर ठेवलेले आढळले. या प्रकरणी गुलजार या संशयिताला अटक करण्यात आली. तो गॅस सिलेंडर आणि सायकल रेल्वे ट्रॅकवर ठेवल्यानंतर व्हिडिओ रेकॉर्डिंग करत होता. हा व्हिडिओ त्याने यूट्यूबवरही अपलोड केला! याखेरीज कानपूर शहरातील गोविंदपूर आणि भीमसेनजवळ साबरमती एक्स्प्रेसचे २० डबे रुळावरून घसरले. ट्रेनचे लोको पायलट ए.पी. बुंदेला यांच्या म्हणण्यानुसार, काही तरी आदळल्यानंतर ट्रेन रुळावरून घसरली. घटनास्थळी जुन्या रेल्वे ट्रॅकचा तुकडा (सुमारे ३ फूट लांब) आणि लोखंडी कडी सापडली. प्रयागराजजवळ काही अज्ञात व्यक्तींनी दुचाकीचे अलॉय व्हील रेल्वे रुळावर टाकले. येथे रेल्वेगाडी मोटार सायकलच्या रिमला धडकल्यानंतर थांबली. तपासणी केली असता झाडाझुडपात एक अलॉय व्हील आणि प्लास्टिकची पिशवी आढळून आली. याखेरीज मध्यंतरी उत्तर प्रदेशमधील फारुखाबाद जिल्ह्यातील कायमगंज-शम्साबाद दरम्यान रुळावर लाकडाचा तुकडा आढळून आला.

अन्य एका प्रकरणात तेलंगणातील रंगारेड्डी येथील लिंगमपल्ली आणि हाफिजपेट स्थानकांदरम्यान लोहमार्गावर लोखंडी रॉड पडलेला आढळून आला. शिवपरू-पदरखेडा स्थानकांदरम्यान बीना-ग्वाल्हेर पॅसेंजर दगडावर आदळली. रेल्वे ट्रॅकची संयुक्त पाहणी केल्यानंतर दोन्ही बाजुंना दगडांच्या खुणा आढळून आल्या. सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी स्टेशन यार्डजवळ ट्रॅकवर 'फाऊलिंग मार्क स्टोन' सापडला. त्याची लांबी चार फूट, रुंदी अर्धा फूट आणि वजन ८०-९० किलो इतके होते. रेल्वे मंत्रालय चोवीस तास ट्रॅकची सुरक्षा करण्यासाठी एआय आधारित विविध उपायांवरही विचार करत आहे. रेल्वे बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की रेल्वे सुरक्षा दल तसेच ट्रॅक मेंटेनन्सचे कर्मचारी वर्षभर नियमित अंतराने रात्रंदिवस गस्त घालतात आणि साबरमती एक्सप्रेस दुर्घटनेनंतर अधिक सतर्क झाले आहेत; परंतु ट्रॅकची कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे वर्षभर रात्रीची गस्त करता येत नाही. रेल्वे वाहतूक विस्कळीत करण्यासाठी ट्रॅकवर मुद्दाम एखादी जड वस्तू ठेवली होती का, याचाही रेल्वे तपास करत आहे. प्रतिकूल हवामानात रेल्वे रुळांच्या देखभालीच्या उद्देशाने रात्रीच्या गस्तीची तरतूद आहे; असामाजिक कृत्यांपासून सुरक्षित करण्याच्या हेतूने नाही, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. याचाच दहशतवादी फायदा घेत आहेत. परिणामी, या धाटणीच्या कारवायांकडे अधिक गांभिर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

आजकाल

# तिरुपतीच्या लाडवांमागील राजकारण

**तुषार गायकवाड**

आंध्र प्रदेश मधील जगनमोहन रेड्डींच्या नेतृत्वाखालील वायएसआरसीपी सरकारच्या कार्यकाळात कर्नाटक दूध महासंघाच्या 'नंदिनी' ब्रँडच्या तुपाच्या जागी खासगी कंत्राटदाराला तिरुपती लाडूसाठी तूप पुरवण्याचं कंत्राट दिलं गेलं होतं. तेव्हा वायएसआरसीपीचा केंद्रात भाजपला पाठींबा होता. हा तूप पुरवठादार बदलल्यानंतर लाडूंच्या गुणवत्तेबाबत अनेक तक्रारी आल्या होत्या. पण त्यावर कारवाई काय झाली? का झाली नाही? हा संशोधनाचा विषय.

आता, नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाच्या (NDDB) सेंटर ऑफ ॲनालिसिस अँड लर्निंग इन लाइव्हस्टॉक अँड फूड (CALF) गुजरात यांच्या प्रयोगशाळेची अहवालाची प्रत भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी सार्वजनिक केली आहे. या अहवालात असे सूचित केले आहे की, सदरील तुपात फिश ऑइल, बीफ टॉलो आणि लार्डचे अंश आहेत. तसेच त्यात अर्ध-घन पांढरे चरबी उत्पादन आहे जे डुकराच्या फॅटी टिश्यूचे प्रस्तुतीकरण करून प्राप्त होते, त्याचा वापर देखील केला गेला आहे. असे म्हटले आहे.

संबंधित कंत्राटदार आणि वायएसआरसीपी यांनी हा अहवालातील दावा फेटाळून लावला आहे. आता योगायोगाने या NDDB CALF चे चेअरमन मीनेश सी. शर्मा हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, आसामचे मुख्यमंत्री हिमांता बिस्वा सरमा व केंद्रीय सडकमंत्री नितीन गडकरी यांचे निकटवर्तीय असल्याचे फोटो




व्हायरल झाले आहेत. तर तिरुमला तिरुपती देवस्थानमच्या २४ सदस्यीय बोर्ड सदस्यांमध्ये एक सदस्य भाजपचे आमदार एसआर विश्वनाथ रेड्डी असल्याचे समोर आले आहे.

या अहवालावरुन भीमा कोरेगांव दंगलीचे मास्टरमाईंड ठरवले गेलेले फादर स्टॅन स्वामी यांच्या लॅपटॉप तपासणी अहवालाचा दाखला दिला जातोय. फादर स्टॅन स्वामी यांनादेखील राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) ने अटक केली होती. लॅपटॉप तपासणी अहवालात स्वामींचे नक्षलवाद्यांशी संबंध असल्याचे जाहीर केले गेले होते. मात्र स्वामी यांच्या वकिलांनी अमेरिकेतील बोस्टनमधील फॉरेन्सिक लॅबकडून याबाबत चाचणी केली.

तेव्हा स्वामी यांच्या लॅपटॉपमध्ये सापडलेल्या माओवादी पत्रांसह इतर ४४ दस्ताऐवजल व कागदपत्रे अज्ञात सायबर हॅकरने तपास यंत्रणांनी छापा टाकण्याआधी एक आठवडा आधी अपलोड केली होती. असे उघड झाले. त्यामुळे च्या अहवालावर राजकारण होणे अपेक्षितच आहे. याआडून भाजपला तिरुपती देवस्थानच्या संपत्तीवर ताबा घ्यायचा आहे अशीही चर्चा सोशल मेडीयावर सुरु झाली आहे.

अशाप्रकारे देवस्थानचे सोने केंद्र सरकारला ताब्यात घेता येऊ शकते का? तर थेट सोने ताब्यात घेता येणार नाही! मात्र चौकशीचा इतर ससेमिरा मागे लावून देवस्थानचे सोने व्याजाने वापरासाठी घेता येणे सोपे जाईल. तशी तरतूद सर्वप्रथम एनडीए सरकारचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी १४ सप्टेंबर १९९९ साली Gold Deposit Scheme, १९९९ या नावाने एक योजना सुरु करुन केली आहे.

एनडीए चे दुसरे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली सत्तेवर येताच, नोव्हेंबर २०१५ मध्ये या योजनेचे नामांतर करुन , २०१५ असे केले. या योजनेंतर्गत धार्मिक संस्थांकडून सोने परतीच्या बोलीवर कर्जरुपाने घेता येते. मोदींनी सदरील योजनेचे नामांतर करताच, सन २०१६ या एका वर्षात देशभरातील ८ मंदिरांनी त्यांचे सोने विविध बँकांमध्ये ठेवले अशी माहीती अर्थमंत्र्यांनी लोकसभेत दिलेली आहे.

असो, तर राम मंदिर व हिंदू मुसलमान ध्रुवीकरण फसले असल्याने व उपयोगिता मुल्य संपलेल्या वायएसआरसीपीला संपवून, चंद्राबाबूला मगरमिठीतून बाहेर पडू द्यायचे नसल्याने, हा नवा देव आणि नवा वाद देशव्यापी पातळीवर गाजवणे हे भाजपा व गोदी मेडीयाचे राष्ट्रप्रथम कर्तव्यच आहे. आपण त्यात कितपत वहावत जायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तीक प्रश्न! **(साभार)**

लोकसंसद

## तंबाखू विरोधी चेतावणी संदेश देणे अनिवार्य

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ओव्हर-द-टॉप (ओटीटी) माध्यमांना तंबाखू विरोधी चेतावणी संदेश देणे अनिवार्य केले असून ओटीटी प्लॅटफॉर्म सुरु होताच किमान २० सेकंदांचा तंबाखूविरोधी दृकश्राव्य संदेश दाखवणे बंधनकारक केले आहे. तसेच कार्यक्रमांच्या सुरुवातीला आणि मध्यंतरात कमीत कमी तीस सेकंद तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांची जाहिरात दाखवणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने मंत्रालयाने नुकताच ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी तंबाखूविरोधी नियमांसाठी सुधारणांचा मसुदा जारी केला आहे. मंत्रालयाने गेल्या वर्षी मे मध्ये जारी केलेल्या तंबाखू विरोधी नियमांमध्ये सुधारणा करून 'सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरात प्रतिबंध आणि व्यापार आणि वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरण नियमन) सुधारणा नियम २०२४' हे नवीन नियम जारी केले आहेत. त्यामुळे नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राइम, हॉटस्टार, एचबीओ मॅक्स, डिस्ने+, हुलू, जिओ सिनेमा, सोनी लिव्ह यांसारख्या ओटीटी माध्यमांवरील कार्यक्रमांसाठी तंबाखू विरोधात चेतावणी देणे अनिवार्य असणार आहे. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणारे वाईट परिणाम हे सर्वांना माहित आहेत. तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे भारतात दरवर्षी अंदाजे १० लाख लोक मृत्युमुखी पडतात. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा निर्णय योग्य असून स्वागतार्ह आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२३ सप्टेंबर**

**१९१८ :-** लेखक, पत्रकार, उपसंपादक, वृत्तसंपादक पंढरीनाथ बळवंत रेगे यांचा जन्म. जवळपास ५० हून अधिक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यामध्ये 'अजब कथा', 'अजब स्पर्धा', 'अद्भुत कथा', 'जादूचा झुंबर' मिळून पंधराहून अधिक कुमारकथा. 'अद्भुत सागर सैतान', 'जंगलची मुले ही कुमार कादंबरी, 'इसापकथा' हा बालकथासंग्रह, वुड्रो विल्सन' हे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे चरित्र, 'भारतीय दंतकथा भाग १ ते ४' अशी साहित्य संपदा. **१९१९ :-** लेखक, ग्रंथपाल, ग्रंथमित्र, ग्रंथप्रचारक शांताराम शंकर रेगे यांचा जन्म. मुंबईतल्या जुन्या ऐतिहासिक वास्तूंवर २१ लेख प्रसिध्द तसेच 'ग्रंथालय शास्त्र' या विषयावर १०० हून अधिक लेख संग्रह प्रकाशित. आताशी मगाशी', 'सुरुंग' ही ललित लेखांची पुस्तके तसेच 'गाढवाचा गोंधळ', 'चलती का नाम गाडी' हे लघुकथा संग्रह आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चित्रमय चरित्र त्यांचे प्रकाशित झाले. **१९१९ :-** ख्यातनाम शिक्षणतज्ञ आणि पुणे विद्यापीठाचे दहावे कुलगुरु देवदत्त अच्युत दाभोळकर यांचा जन्म. त्यांनी पायलट सर्व्हे ऑफ शिरुर तालुका, सरदार सरोवर डिबेट', 'अँग्रो इंडस्ट्रियल बॅलन्स', 'क्लाइंबिंग ए वॉल ऑफ ग्लास' आदी पुस्तके लिहिली. **१९२० :-** लेखक, अभिनेते, दिग्दर्शक प्रा. भालबा केळकर यांचा जन्म. **१९३३:-** साहित्यिक रघुनाथ माधव पाटील कवी आरेस' यांचा जन्म. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्राची आवड असणाऱ्या रघुनाथरावांचा 'मातीत मिलानं मोती' ह्या लोकप्रिय कादंबरीसह 'मळा', 'कलंदर', 'केळफूल' हे काव्यसंग्रह. 'वणव्यातल्या वेली', 'कथा दोघांच्या, ऋतू प्रितीचा' हे कथासंग्रह तर 'आधार वृक्ष' हे चरित्रात्मक तसेच 'केळव्याची शितलादेवी' ही माहितीपर पुस्तिका प्रसिध्द. **१९३४ :-** लेखक चिंतामण शंकर जोशी यांचा जन्म. ह्यांचा 'नबाब' हा कथासंग्रह आणि 'लॉलीपॉप' शतरंज, स्वप्न' ही कादंबरी, अशी साहित्य संपदा. **१९४१ :-** इतिहास संशोधक नानासाहेब मिरीकर यांचा जन्म. अहमदनगरचा प्राचीन खरा इतिहास' हा त्यांचा ग्रंथ प्रसिध्द ज्ञानदेव वाड्:मयाचे व्यासंगी असणाऱ्या मिरीकरांच्या नावावर 'धनुर्भग नावाचे नाटकही आहे. **१९४७ :-** ख्यातनाम समीक्षक, कवी डॉ. जयंत बलवंत वष्ट यांचा जन्म. यांच्या साहित्य संपदेत 'स्मशानयात्रा', 'शोधयात्रा' ह्या काव्यसंग्रहासह 'राजकवी तांबे', 'चरित्रचिंतक द. न. गोखले', 'व्यक्तिमर्शकाच्या नजरेतून सावरकर-गांधी- आंबेडकरी', 'मराठी चरित्र : रुप आणि इतिहास', 'काही पुस्तके-काही परिक्षणे', 'चरित्रशोधन', 'राजकवी तांबे : काव्य आणि काव्यास्वाद', 'प्रभातकार वा. रा. कोठारी हे संपादित साहित्य, अशी साहित्य संपदा. **१९५०:-** थोर समाजसेवक, लेखक डॉ. अभय बंग यांचा जन्म. 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' त्यांचे आत्मवृत्त प्रसिध्द. **१९५८:-** 'पर्यावरण' जगण्यासाठी कायमस्वरुपी कोकणातील एका खेडयात स्थायिक झालेले पर्यावरण प्रेमी लेखक, व्याख्याते दिलीप कुलकर्णी यांचा जन्म. या विषयावर 'निसर्गायन' मधून पर्यावरणाचा मुलगामी विचार, 'हसरे पर्यावरण' हे शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरण संवादरुपाने समजावून देणारं पुस्तक. 'दैनंदिन पर्यावरण' मधून दैनंदिन जीवनात पर्यावरणीय दृष्टीनं काय करावं? हे खुसखुशीत शैलीत सांगणारे पुस्तक. मानवजातीचा खऱ्या विकासाकडे नेणाऱ्या मार्गाचा शोध घेणारे 'सम्यक विकास' हे पुस्तक 'वेगळ्या विकासाचे वाटाडे' मधून पाच विचारवंताच्या विचारांचा परीक्षण, 'हरित संदेश' हे पर्यावरणवरील घोषवाक्यांसारख्यास संदेशातून पर्यावरणीय कृतीकडे लक्ष वेधणारी पुस्तिका तसेच वैदिक गणित भाग १ ते ४ यातून गणित सोडवण्याच्या सोप्या रीती, अणू विवेक नसून अण्वस्त्र अणूचाचण्या यांच्या विनाशाची वास्तवता या पुस्तकांवर 'गतिमान संतूलन' या मासिकाचे संपादक. **१९६१ :-** लेखक, कवी वा. ना. आंधळे यांचा जन्म. 'फर्मान', 'स्पंदन', 'गुलमोहर' आदी काव्यसंग्रह प्रसिध्द.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ सप्टेंबर

१) श्री. अशोक मधुकर डोळस
वेश्वी, अलिबाग, २३-९-१९४६

२) श्रीम. प्रणिता प्रमोद गुरव
चेंढरे, अलिबाग, २३-९-१९५६


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# वाढवण बंदराविरुद्ध एकजुटीने लढा द्या

■ **शेतकऱ्यांचे नेते रघुनाथ पाटील यांचे आवाहन**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
**केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेतकरी व कष्टकरी कामगारांचे खूप नुकसान झाले आहे. वाढवण बंदरामुळे अनेक गावे प्रस्थापित होणारा असून मच्छीमार समाजाचे खूप नुकसान होईल. यामुळे वाढवण बंदर रद्द करण्याच्या विरोधात सर्वांनी एकजुटीने लढा दिला पाहिजे. असे स्पष्ट उद्गार शेतकऱ्यांचे नेते रघुनाथ पाटील यांनी जाहीर सभेत काढले आहेत.**




भारतीय जीवन व पृथ्वी रक्षक चळवळीचे निमंत्रक अ‍ॅड. गिरीश राऊत यांनी १९ सप्टेंबर रोजी दादर येथील धुरु हॉलमध्ये वाढवण बंदर रद्द करा, या व इतर मागण्यांसाठी देशातील मान्यवरांची एक संयुक्त सभा आयोजित केली होती.

यावेळी पर्यावरण अभ्यासक अ‍ॅड. गिरीश राऊत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, वाढवण बंदर, जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प, बारसू रिफायनरी अशा महाकाय प्रकल्पामुळे पृथ्वीच्या पर्यावरणात दुरुस्त न होणारा हस्तक्षेप होणार आहे. विकासासाठी राजकीय क्षेत्राने औद्योगिकीकरणाच्या रूढ चौकटीत विचार केल्याने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येत नाही. विकासाचे मॉडेल म्हणून देशापुढे ठेवलेले गुजरात बुडाले व बडोदा जाम नगरातील उच्चभ्रू वस्त्यांसह इतरही शहरात मगरीचा संचार सुरू झाला, ही गोष्ट बोलकी असल्याचे त्यांनी सांगितले.

या सभेला ज्येष्ठ कामगार नेते अ‍ॅड. एस.के. शेट्ये, पोर्ट ट्रस्ट कामगार अंकाचे कार्यकारी संपादक मारुती विश्वासराव, शिक्षक लोकशाही आघाडीचे अध्यक्ष जनार्दन जंगले, डॉ. सचिन बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

> **वाढवण येथे खोल समुद्र असल्यामुळे चांगल्या प्रकारची मच्छी मिळते. वाढवण बंदर झाल्यास मच्छीमारांचे खूप नुकसान होणार आहे. यामुळे मच्छीमार समाज या वाढवण बंदराला शेवटपर्यंत विरोध करणार आहे.**
> **– रामकृष्ण तांडेल, उपाध्यक्ष, महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती**

### स्थानिक लोकांचे खूप नुकसान

**डॉ. शशिकुमार मेनन यांनी सांगितले की, आम्ही नरीमन पॉइंट ते पालघर या समुद्रकिनाऱ्याचा संपूर्ण अभ्यास केला आहे. तसेच, पालघर येथे होणारे वाढवण पोर्ट करू नये असा अभ्यासकांचा व शास्त्रज्ञांचा अहवाल असतानाही वाढवण बंदराचे भूमिपूजन झाले आहे. या ठिकाणी समुद्रात ३० मीटर पाण्याची खोली असल्यामुळे मोठ्या बोटी लागू शकतात. यामुळे केंद्र सरकारने वाढवण येथे पोर्ट बनविण्याचा विचार केला आहे.**

## मुरूडमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

**। कोर्लई । वार्ताहर ।**
मुरुड पंचायत समितीत मुरुड तालुका विधी सेवा समिती वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी न्यायाधीश घन:श्याम तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली जेष्ठ नागरीक, अल्पवयीन मुले व महिलांचे हक, महिलांच्या सुरक्षा व गोपनीयता, पिडीतांसाठी नुकसान भरपाई योजना, दुष्काळ पुर औद्योगिक आपत्तीमुळे बाधित झालेल्यांना शासकीय योजना या विषयांवर कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते.



यावेळी अ‍ॅड. डी.एन.पाटील यांनी जेष्ठ नागरीकांचे हक्क याबाबत मार्गदर्शन केले. तर, अ‍ॅड. ए.ए. चोगले यांनी अल्पवयीन मुले व महिलांचे हक्क याबाबत मार्गदर्शन केले. तसेच, अ‍ॅड. एम.जे.तांबडकर यांनी पिडीतांसाठी नुकसान भरपाई योजनांबाबत माहिती दिली.

या कायदेविषयक शिबीरात तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश घन:श्याम तिवारी, मुरुड वकील संघाचे सचिव अ‍ॅड. डी.एन. पाटील, अ‍ॅड. एम. जे. तांबडकर, अ‍ॅड. ए.ए. चोगले व अ‍ॅड. एम.एस. सतविडकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, पर्यवेक्षिका शुभांगी कोतवाल, विजया खेऊर, अंगणवाडी सेविका, त्यांच्या सहाय्यक, आशा वर्कर आदी. उपस्थित होते.

## रोह्यामध्ये सतर्कता जागृत ग्रामसभा

**। कोलाड । वार्ताहर ।**
देशपातळीवर बँक ऑफ इंडिया ही सार्वजनिक क्षेत्रातील मोठी बँक असून राज्यात तसेच जिल्हा स्तरावरील रायगड जिल्ह्याची अग्रणी असलेल्या बँक शाखेमार्फत 'एकात्मतेच्या संस्कृतीद्वारे राष्ट्राची समृद्धी' या मार्गदर्शनाखाली संपूर्ण देशभरात १६ ऑगस्ट ते १५ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जागरूकता सप्ताह पाळला जात आहे. या अंतर्गत रायगड विभागातील येणाऱ्या सर्व शाखांनी जिल्ह्यात विविध वेगवेगळ्या ठिकाणी २० सप्टेंबर रोजी ग्रामसभा आयोजित केली होती. याला संबधीत ग्राहकांकडून उत्स्पुर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी झोनल मॅनेजर मुकेश कुमार व डेप्युटी झोनल मॅनेजर बिरेन चॅटर्जी यांच्या मार्गदर्शनानुसार बँक ऑफ इंडिया रायगड झोनतर्फे विविध ग्रामीण व निमशहरी शाखांमध्ये विविध शाखांच्या शाखा व्यवस्थापकांनी ग्रामसभा आयोजित केल्या होत्या.





## व्याख्यान कार्यक्रम संपन्न

**। रसायनी । वार्ताहर ।**
रायगड जिल्हा परिषदेकडून राबविला जात असलेल्या 'स्वच्छता ही सेवा' या कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक वडगाव शाळेकडून स्वच्छता रॅली, स्वच्छता प्रतिज्ञा, स्वच्छता गीत गायन, पथनाट्य, मानवी साखळी या द्वारे जनजागृती करण्यात आली. यावेळी आरोग्य मार्गदर्शक कविता दहिफळे यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी स्वच्छता किती महत्त्वाची आहे हे उदाहरण देऊन पटवून दिले व पालकांना आरोग्य विषयी मार्गदर्शन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, सर्व शिक्षक, स्वयंसेविका यांसह गाव स्वच्छता मोहीम राबविली. यासाठी मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या अध्यक्षतेखाली वैजनाथ जाधव उपक्रमाचे प्रमुख व मयुरी धायगुडे उपक्रम सहायक यांनी नियोजन करून घोषवाक्ये, गीत, नाट्य इत्यादींचे आयोजन केले.



## माणगावमध्ये शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रम

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
माणगाव येथील जे.बी. सावंत एजुकेशन सोसायटीचे टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज व श्रीमती सवती नीलकंठ सावंत ज्युनिअर कॉलेजमधील एकूण ८३ विध्यार्थ्यांना प्रत्येकी २ हजसा ५०० रुपये शिष्यवृत्तीचे वाटप शुक्रवारी (दि.२०) करण्यात आले. या शिष्यवृत्तीचे धनादेश माणगाव तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार घेमुड व संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत व महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक त्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

शिवाजी मंदिर ट्रस्ट दादर व सरस्वती एजुकेशन सोसायटी मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. मेजर सुधीर सावंत व आण्णासाहेब सावंत तसेच नानासाहेब सावंत यांच्या संकल्पनेतून बहुजन समाजातील गरीब विध्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी एकूण २ लाख ७ हजार ५०० रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वाटप विध्यार्थ्यांना करण्यात आले. यामुळे गरीब विध्यार्थ्यांच्या फीचा प्रश्न सुटल्याचे प्राचार्य हर्षल जोशी यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितले.

## रसायनीमध्ये हास्य कविसंमेलन उत्साहात

**। रसायनी । वार्ताहर ।**
मुंबई मराठी साहित्य संघ व सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२१) सायंकाळी निमंत्रितांचे हास्य कविसंमेलन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंबई मराठी साहित्य संघाच्या कार्याध्यक्षा उषा तांबे यांनी तर सूत्रसंचालन मनोज वराडे यांनी केले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रमुख कार्यवाह डॉ. अश्विनी भालेराव, प्रकाश पागे कोषाध्यक्ष, अशोक बेंडखळे कार्यवाह, शब्दवेल सचिव अश्विनी अतकरे, खजिनदार देवेंद्र इंगळकर उपस्थित होते.



या कविसंमेलनामध्ये नितीन वरणकार, संजय कावरे, प्रवीण सोनोने, महादेव लुले, अमोल चरडे, प्रवीण बोपुलकर या कवींनी आपल्या कविता सादर केल्या. याप्रसंगी महाराष्ट्राचा हास्य कवी स्पर्धा २०२४ या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम सुद्धा पार पडला. यामध्ये प्रथम श्रीराम घडे-मेहुणीची आरती, द्वितीय अजय माटे-गूड मॉर्निंग पथक, तृतीय पल्लवी चिंचोळकर-उद्यापासून सुरूवात करते, तर उत्तेजनार्थ क्रमांक आर.के. आठवले-जांगडगुत्ता, रामदास गायधने-डावा डोया, चेतन सुरेश सकपाळ-खड्ड्यांचे आभार, महेंद्र सूर्यवंशी-पडत जा तिच्या पाया, विशाल कुलट-जुटीन काय भौ यंदा माय लगन, रुतुजा कुलकर्णी-खिशातलं पाकीट चेक करायला हवं, नंदेश गावंड-निराशा, अशोक मिरगे-माझी कोपरखळी, रविकिरण पराडकर-पॉझिटिव्ह, सागर सोनवणे-भाऊबीज यांना प्राप्त झाला.



## तुकाराम वस्तादांची पुण्यतिथी साजरी

**। कोलाड । वार्ताहर ।**
आदिशक्ती कलगी तरुण मंडळ रोहा, माणगाव, सुधागड यांचे गुरुवर्य पट्टे तुकाराम वस्ताद यांचा ३३ वी पुण्यस्थिती सोहळा मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शक्तीवाले शाहीर संतोष कांबळे तसेच तुरेवाले शाहीर वसंत भोईर यांच्या गायनाने रसिकांची मने जिंकली.

यावेळी नाचाच्या जंगी सामन्यांचे उद्घाटन सुशील शिंदे, राहुल शिंदे, विजय सानप, आशिष गांधी, तुकाराम सानप, अशोक लहाने, रविंद्र मामळुस्कर, विठोबा खांडेकर, मोहन सानप, किसन ढोकरे, उमाजी जाधव, अनिल सानप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शक्तीवाले शाहीर संतोष कांबळे नाच मंडळ श्रीवर्धन तसेच तुरेवाले शाहीर वसंत भोईर नाच मंडळ रोहा या दोघांनी तोडीस तोड गण गौळण तसेच रामायण, महाभारत यांच्या शास्त्रावर आधारित पदे सादर करून रशिकांची मने जिंकली.

## किशोरवयीन मुलींना आरोग्य मार्गदर्शन

**। म्हसळा । वार्ताहर ।**
एकात्मिक बाल विकास नागरी प्रकल्प तळा बिट अंतर्गत म्हसळा शहरातील १० अंगणवाडी, चिराठी, दुर्गवाडी, आदिवासी वाडी, सावर, बौद्धवाडी, राम मंदिर, कुंभारवाडा, नवेनगर, पोस्ट लेन, काझी मोहल्ला मिळून 'राष्ट्रीय पोषण माह' अभियान व 'सही पोषण देश रोशन' कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमा अंतर्गत किशोरवयीन मुलींना आहार, आरोग्य या विषयावर मार्गदर्शन तसेच तिन ते सहा वर्षे मुलांसाठी पूर्व शालेय शिक्षण, ओटी भरण, अन्न प्राशन दिन, सुपोषण दिवस, टिएचआर पासून बनविलेले पदार्थ, गरोदर व स्तनदा मातांना देण्यात येणाऱ्या सेवा, परसबाग, लेक लाडकी योजना, बेटी बचाव बेटी पढ़ाव, लाडकी बहिण योजना या सर्वांचे फलक लावण्यात आले होते.



## मोदक स्पर्धेत नरवणकर प्रथम

**। महाड । प्रतिनिधी ।**
महाड येथील लोकविकास सामाजिक संस्थेकडून साखरचौथ गणेशोत्सवाचे औचित्य साधून मोदक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १५० महिलांनी सहभाग घेत मोदकाचे विविध प्रकार सादर केले होते. या मधून दर्शना नितीन नरवणकर यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. ही स्पर्धा विरेश्वर महाराज सभागृहात शनिवारी (दि.२१) घेण्यात आली होती.

गेली ९ वर्षे साखरचौथ गणपती उत्सवादरम्यान विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी महिला वर्गासाठी मोदक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी महाड मधील सुमारे १५० महिलांनी स्पर्धेत भाग घेत मोदकाचे विविध प्रकार सादर केले. महिलांनी सादर केलेल्या मोदकांचे परीक्षण मेधा भुस्कुटे व आश्विनि यांनी केले. यामध्ये प्रथम क्रमांक दर्शना नरवणकर, व्दितीय क्रमांक राखी साळुंखे, तृतीय क्रमांक समिक्षा टाकळे तर उत्तेजनार्थ मोनिका फंड, शितल गादे, कल्पना खैरकर, शितल गांधी, अक्षता अवसरे, प्रणाली वनारसे, नमिता मालुसरे आदींची निवड करत मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## माथेरानच्या मुख्य रस्त्याचे विद्रुपीकरण

■ पत्र्याच्या कंपाऊंडचा रहदारीला अडथळा

**। माथेरान । वार्ताहर ।**
माथेरानची मुख्य रस्त्यावरील बाजारपेठ खूपच सुटसुटीत आणि ऐसपैस आहे. परंतु, याठिकाणी असणाऱ्या रस्त्यालगत मस्जिद तसेच हॉटेल अलंकार यांनी त्यांच्या जागे व्यतिरिक्त नगरपरिषदेच्या जागेतील रस्त्यावरच पत्र्याचे कंपाऊंड केले आहे. मुळात रस्त्याला कमी जागा असताना या कंपाऊंडमुळे रस्ता खूपच अरुंद झाला आहे.

मस्जिद तसेच हॉटेल अलंकार यांनी त्यांच्या दगडी कंपाऊंडला लागून पत्र्याचे बांधकाम केले असते तर काही अडचणी निर्माण झाल्या नसत्या. परंतु, नगरपरिषदेच्या गटारावर अगदी रस्त्यालगत पत्र्याचे कंपाउंड केल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. तसेच, या गटारात पडणारा कचरा नगरपरिषदेच्या कामगारांना, घनकचरा व्यवस्थापन कामगारांना गोळा करता येत नाही. तसेच, या गटारांवर स्थानिक भूमिपुत्रांना छोट्या टपऱ्या बांधण्यास दिल्या तर याच माध्यमातून नगरपरिषदेला भाड्यापोटी उत्पन्न प्राप्त होऊ शकते. आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी देखील उपलब्ध होऊ शकतात.



अशाप्रकारे संबंधितांनी याठिकाणी अनधिकृतपणे कंपाऊंड केल्यामुळे मुख्य बाजारपेठेत एकप्रकारे विद्रुपीकरण दिसत आहे. नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने हे कंपाऊंड बांधण्यात आले त्यावेळी दुर्लक्ष का केले, याबाबत सुध्दा तर्कवितर्क लढविले जात आहेत. यामुळे लवकरच सदरचे विद्रुपीकरण काढून टाकावे, अशी स्थानिकांमधून मागणी केली जात आहे.

### कल्याण येथील प्राध्यापिकेचा दानशूरपणा

# कर्जतमधील विद्यार्थिनींना सायकल भेट

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
**कर्जत शहरातील महिला मंडळ संस्थेच्या विद्या विकास मंदिर शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थिनी या दूरवरून शाळेत येत असतात. यामुळे त्या मुलींसाठी शाळेत ये-जा करण्यासाठी सायकली देण्यात याव्यात अशी इच्छा कल्याण येथील बिर्ला महाविद्यालयाच्या प्राध्यापिका माधवी ठाकूर देसाई यांच्याकडे करण्यात आली होती. यानुसार माधवी ठाकूर देसाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून शाळेतील १५ विद्यार्थिनींना देण्यात आल्या.**



कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर या शाळेत एका नवीन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांचा विचार करता घर ते शाळेतील अंतर कमी करण्यासाठी संस्थेने कल्याणच्या बिर्ला कॉलेजच्या प्रोफेसर माधवी ठाकूर देसाई यांच्याकडे आपली समस्या मांडली होती. देसाई यांनी त्यांच्या ओळखीच्या व्यक्तींसोबत तात्काळ संपर्क साधून शाळेतील विद्यार्थ्यांसाठी १५ सायकलींची व्यवस्था करून दिली. या सायकली लेखक अच्युत गोडबोले तसेच थनी फर्नांडिस, धनंजय मदन आणि त्यांचे सहकारी सायकल वीर, अभिनय घाग, प्रवीण देशपांडे, प्रसाद कर्वे यांच्या उपस्थितीत देण्यात आल्या.

यावेळी लेखक अच्युत गोडबोले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, आपल्या मनातील प्रत्येक समस्या आणि शंका या आपल्या शिक्षकांना विचारून त्यांचे निरसन करण्यासाठी सतत पुढाकार घेतला पाहिजे. तसेच, आपल्या मनातील विषयांना कागदावर उतरवले पाहिजे. यातून एखादा चांगला लेखक रायगडला मिळेल.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला मंडळ संस्थेच्या कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहा गाढे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी शोभना गोडबोले, दिपाली केसकर, संस्थेच्या उपाध्यक्षा वैदेही पुरोहित, सदस्या श्रीमती पूजा सुळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रद्धा मुंडेकर यांनी केले.

## काळ्या चिंबोऱ्यांना खवय्यांची पसंती

**। तळा । वार्ताहर ।**
तळा बाजारपेठेत सध्या काळ्या चिंबोऱ्या विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. वर्षातून फक्त तीन महिने या चिंबोऱ्या मिळत असल्याने बाजारपेठेत त्यांना मागणी वाढली आहे. यामुळे या काळ्या चिंबोऱ्या विकुन आदिवासी आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत.



पावसाळ्यानंतर नदीचे पाणी ओसरू लागल्यावर पुन्हा मासेमारीला मोठ्या प्रमाणावर सुरुवात होते. पावसाळ्यानंतर नदीचे पाणी शुद्ध झाल्यावर आदिवासी बांधव रात्रीच्यावेळी नदीच्या किनारी गॅसबत्तीच्या साहाय्याने दगड-गोटात काळ्या चिंबोऱ्या पकडायला जातात. या चिंबोऱ्या काळ्याभोर असल्यामुळे रात्रीच्या अंधारात मोठ्या चतुराईने तिला पकडावे लागते. पावसानंतर वर्षभरात दोन ते तीन महिनेच नदीला चिंबोऱ्या मिळतात. यामुळे या चिंबोऱ्यांना चांगला भाव मिळतो. सध्या तळा बाजारपेठेत तीनशे रुपयांना सहा चिंबोऱ्या या प्रमाणे विक्री केली जात आहे. चिंबोरीचे अनेक औषधी गुणधर्म असल्याने शहरातील नागरिक स्वतःसह शहरात असलेल्या आपल्या नातेवाईकांना पाठविण्यासाठी त्या खरेदी करतात. यामुळे आदिवासींना रोजगार उपलब्ध होतो.

# स्मशानभूमीत कुत्र्यांचा वावर

■ मृतदेहाची विटंबना होण्याची शक्यता



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**कळंबोली-रोडपाली येथील स्मशान भूमीत सध्या भटक्या श्वानांचा सुळसुळाट वाढला आहे. या भटक्या श्वानांमुळे मृतदेहांची विटंबना होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने याची वेळीच दखल घेऊन श्वानांवर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी केली जात आहे. भटक्या श्वानांनी स्मशानभूमीत जळत्या चितेवरील मृतदेहाचे लचके तोडल्याच्या घटना या पूर्वी घडल्या आहेत. अशा घटना घडून मृतदेहांची विटंबना होण्याची शक्यता असल्याने या घटना रोखण्याठी प्रशासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे.**

पनवेल पालिका हद्दीतील कळंबोली-रोडपाली परिसरात सिडकोच्यावतीने स्मशान भूमीची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. लाखोची लोकसंख्या असलेल्या या परिसरातील दररोज दोन ते तीन मृतदेह अंत्यसंस्कार करण्यासाठी आणले जात असल्याने सिडकोच्यावतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती या ठिकाणी करण्यात आली आहे. सरणावर लाकडं रचण्यापासून ते मृतदेह पूर्णपणे जाळण्याची जवाबदारी हे कर्मचारी पार पडतात. मात्र, या ठिकाणी वाढलेल्या भटक्या श्वानांच्या संख्येमुळे येथील कर्मचाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. स्मशान भूमीत भटकणाऱ्या श्वानांचा वावर जळत्या चितेपर्यंत असल्याने कामगारांना अत्यंत काळजीपूर्वक आपले काम पूर्ण करावे लागत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

पालिकेच्या अधिकाऱ्यांशी या बाबत संपर्क साधला असता वारंवार या ठिकाणी श्वान पकडण्यासाठी गाडी पाठवण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. मात्र, अनेकदा हे श्वान हाती लागत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

### तीन ठिकाणी सरणाची व्यवस्था

**स्मशान भूमीत अंत्यविधी करण्यासाठी तीन ठिकाणी सरणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. अनेकदा सरणासाठी उपलब्ध करून दिलेल्या जागेतच श्वान आपली पिल्लं जन्माला घालत असल्याने मोठी गैरसोय होत असल्याची माहिती येथील कर्मचाऱ्यांनी दिली आहे.**

### श्वान नियंत्रणासाठी लाखो रूपये खर्च

**भटक्या श्वानांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पालिका प्रशासन दर वर्षी लाखो रुपये खर्च करते. या खर्चातून श्वानांचे निर्मितीकरण केले जात असल्याचा दावा प्रशासन करते. स्मशान भूमीत सध्या नुकतीच जन्माला आलेली श्वानाची पिल्ले फिरताना दिसून येत असल्याने प्रशासनाचा हा दावा फोल ठरताना दिसत आहे.**

> **भटक्या श्वानांनवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रसासनाने प्रयत्न करावेत. या करता पाठपुरावा केला आहे. तसेच, स्मशान भूमीत मनुष्यबळ वाढवण्याची मागणी देखील प्रशासनाकडे या पूर्वी केली आहे.**
> **– अमर पाटील, माजी नगरसेवक**



## एकही विद्यार्थी बेरोजगार राहणार नाही

### सुभाष देसाई यांचे प्रतिपादन

**। माणगांव । प्रतिनिधी ।**

भारत देशात भरपूर मनुष्यबळ आहे. सुशिक्षित युवक देखील मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र, त्यांना रोजगार आणि नोकऱ्या उपलब्ध नाहीत. त्यासाठी प्रत्येक शाळेत किमान कौशल्य आधारित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. भारतात नोकऱ्यांची कमी नाही. परंतु, कुशल कामगार नसल्याने नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत. यासाठी प्रबोधन कौशल्य निकेतन मार्फत तळागाळातील गोरगरीब विध्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देत आहोत. या रोजगार संधीमुळे त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहे. येथील एकही विध्यार्थी बेरोजगार राहणार नाही, हि प्रबोधन व पहेलची गॅरंटी असल्याचे प्रतिपादन माणगांव येथील प्रबोधन कौशल्य निकेतन मार्फत आयोजित करण्यात आलेल्या प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात माजी उद्योग मंत्री सुभाष देसाई यांनी केले.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र सिमलेस लि. अधिकारी शिवकुमार जिंदाल, मानव संसाधन उपप्रमुख आत्मकुमार चक्रपाणी, रोहा औद्योगिक क्षेत्र चेअरमन भारदेस्कर, प्रबोधन गोरेगाव अध्यक्ष नितीन शिंदे, प्रबोधन संचालक डॉ. संतोष कामेरकर, पहल अंकुश भारद्वाज, नगरसेवक अजित तार्लेकर, डॉ. परेश उभारे, ग्रामीण प्रगती फाऊंडेशन मंगेश डफळे, विध्यार्थी, पालक, ई. उपस्थित होते. यावेळी विध्यार्थी व पालक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## काशीद किनाऱ्याला पर्यटकांची चणचण

**। मुरूड शहर । वार्ताहर ।**

गणेशोत्सव नुकताच संपन्न झाला आहे. या काळात चाकरमानी मंडळी मुरूड, काशीद परिसरात आली होती. यामध्ये पर्यटकांचा समावेश फारसा दिसून आला नाही. मोठी वर्दळ असणाऱ्या काशीद या प्रसिद्ध समुद्रकिनाऱ्यावर हंगामातील शनिवारी देखील पर्यटक दिसून आलेले नाहीत. गणेशोत्सवानंतर पर्यटक येतील ही अपेक्षा फोल ठरली असल्याची माहिती येथील स्टॉल धारक संदीप बेलोसे आणि सूर्यकांत जंगम यांनी दिली आहे.

पर्यटन हंगामात काशीद समुद्रकिनाऱ्यावर ५०० ते ६०० वाहने येत असतात. मात्र, शनिवारी सायंकाळी ६० ते ६५ वाहनांतून फक्त २५० ते ३०० पर्यटक आल्याची माहिती सूर्यकांत जंगम यांनी दिली आहे. काशीद समुद्रकिनाऱ्यावर सुमारे ५० स्टॉल्स असून १६ ऑगस्ट पासून सुरू करण्यात आले आहेत. परंतु, पर्यटकांअभावी पर्यटन व्यवसाय ठप्प झाला असून अनेकांना वीज बील भरण्यासाठी हाताशी पैसे नाहीत. अशी अवस्थाअसल्याचे जंगम यांनी सांगितले.

जंजिरा जलदुर्ग अजूनही पर्यटकांसाठी बंद आहे.शिवाय काशीद समुद्रकिनाऱ्यावरील बोटिंग देखील अद्याप सुरू नसल्याने पर्यटक येत नाहीत. याचा मोठा परिणाम हॉटेल्स, रेस्ट हाऊसेस, छोटे व्यवसायिक, सुरक्षा जीवरक्षक, घोडेस्वारी, स्टॉल्सधारक यांच्यावर झाला असून मोठी आर्थिक चणचण निर्माण झाली आहे.पर्यटनाचा हंगाम सुरू झाला असतानाही पर्यटकांना भावणाऱ्या ऐतिहासिक वास्तू किंवा करमणुकीची साधने वेळेत सुरू नसतील तर पर्यटक येणार कसे, असा प्रश्न जंगम आणि संदीप बेलोसे यांनी उपस्थित केला आहे.



**मुरूड एकदरा या गावाला इतिहास आहे. जंजिरा किल्ल्यात राहणाऱ्या कोळी बांधवांची वस्ती १९६० साली या डोंगरावर वसवण्यात आली ते हे गाव एकदरा आजही नव्वदी गाठलेले ज्येष्ठ नवाबकालीन आठवणी सांगतात. असे वारसा असलेले समुद्रकिनारी वसलेले हे गाव.** (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## गुळसुंदेत बिबट्याच्या वावरामुळे खळबळ

**। रसायनी । वार्ताहर ।**

गुळसुंदे येथील अंकुश साठे यांच्या घराबाहेर बिबट्या दिसल्याने परिसरात खळबळ माजली आहे. गुळसुंदे येथे राहणारे अंकुश साठे यांना पहाटे साडेतीन वाजता घराच्या बाहेर बिबट्या दिसल्याने त्यांनी आरडाओरड केली. आरडाओरड केल्याने बिबट्या पळून गेला. दुसऱ्या दिवशी अंकुश साठे यांनी बिबट्या दिसल्याची घटना काही ग्रामस्थांना सांगितली. अंकुश साठे यांच्या निवासस्थाना बाहेर असलेल्या सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यात बिबट्या दिसून आला. ही घटना प्राणीमित्र मनोहर कुलकर्णी आणि प्रथमेश मोकल यांना समजली असता त्यांनी आपटा वनअधिकारी व गुळसुंदे ग्रामपंचायतीला या बाबत माहिती दिली. तसेच, बिबट्या दिसल्याने गावातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्याचे ग्रामपंचायतीला सांगितले.



वनअधिकारीयांनीयासीसीटीव्ही फुटेज व बिबट्या जिथे आला होता तेथील जमिनीवर पाहणी केली असता बिबट्या आल्याचे दिसून आले. सीसीटीव्ही फुटेजमध्ये बिबट्या येताना व जातानाचे निदर्शनास आले आहे. तसेच, जमिनीवर बिबट्याच्या पायाचे ठसेही दिसले. गुळसुंदे ग्राम पंचायत आणि आपटा वनअधिकारी यांनी परिसरातील ग्रामस्थांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही नागरिकांनी रात्रीच्या वेळी बाहेर एकटे फिरू नये. बाहेर फिरायला जाताना सोबत काठी व बॅटरी सोबत घेवून जावे. आपल्या जवळील पाळीव प्राण्यांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केले आहे. गुळसुंदे परिसर कर्नाळा किल्ल्याच्या जवळ असल्याने त्या परिसरात बिबट्या आल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## गणेशोत्सवाची शिस्तबद्ध रीतीने सांगता

**। सारळ । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यात संपूर्ण गावाने एकत्र येऊन साजरा केला जणारा सार्वजनीक गणेशउस्तव फार दुर्मिळ आहे. ६४ वर्षाची परंपरा असणारा सारळचा सर्वजनिक गणेश उस्तव म्हणजे फक्त गावासाठी नव्हे तर आजूबाजूच्या गावांसाठी देखील अकर्षणाचा विषय आहे. त्याचे कारण म्हणजे गावात अठरा फगड जाती आहेत. यात माळी, कोळी, आगरी यांचे प्राबल्य असले तरी सोबत इतर जाती असणारा एकोपा हा इथे बघण्यासारखा आहे. गोविंदा, होळी सत्यनारायण पूजा आणि गणपती हे उत्सव येथे पूर्ण गाव एकत्र येत साजरे करत असतो. गणेशोत्सवादरम्यान नेसर्गिक असणारी सजावट, विविध स्पर्धांचे आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रम व हळदी कुंकू समारंभाचे आयोजन केले जाते. तसेच, गणेश विसर्जनासाठी संपूर्ण गावाचे ग्रामस्थ शिस्तबद्ध रीतीने टाळ, ढोलकी व भजनाच्या गजरात मिरवणुकीत सामील होत असतात. तसेच, गणेश विसर्जनानंतर समुद्र किनाऱ्याची स्वच्छता करण्यासाठी गावातील तरुणाईन पुढाकार घेत असते.

## ‘तालुक्यात निकृष्ट दर्जाचा धान्यपुरवठा’

**। महाड । प्रतिनिधी ।**

शासनाकडून गोर गरीबांसाठी अल्प दरात धान्य पुरवठा केला जातो. या धान्य पुरवठ्यात प्रचंड प्रमाणात गैव्यवहार होत असल्याने नागरिकांना निकृष्ट दर्जाचे धान्य उपलब्ध होत आहे. नाईलाजास्तव गोरगरीब नागरिकांना हे धान्य घ्यावे लागत आहे. धान्य पुरवठा करणाऱ्या ठेकेदाराकडून काळाबाजार केला जात असल्याचे रास्त धान्य दुकानदारांचेदेखील म्हणणे आहे.

महाड तालुक्यात काही भागांमध्ये निकृष्ट दर्जाचा तांदूळ पुरवठा करण्यात आला आहे. या धान्यांमध्ये प्रचंड प्रमाणात अळ्या निर्माण झालेल्या दिसून येत आहेत. तसेच, अनेक भागांमध्ये प्लास्टिक सदृश्य तांदूळदेखील अनेक वेळा पुरवठा होत असल्याची तक्रार ग्रामीण भागातील महिलांकडून करण्यात येत आहे. परंतु, महाड तालुक्यात रास्त धान्य गोदामातून चांगल्या दर्जाचा तांदूळ पुरवठा होत असतो. मात्र, ग्राहकांना निकृष्ट दर्जाचा तांदूळ मिळत असल्याने पुरवठादाराकडूनच हा सावळा गोंधळ केला जात असल्याची माहिती एका पुरवठा दुकानदाराने दिली आहे. शिवाय धान्यांच्या गोणींमधून ५० किलो पेक्षा कमी धान्य पुरवठा देखील केला जात आहे. महाड तहसील कार्यालयातील पुरवठा विभागामधील या सावळ्या गोंधळामुळे ग्राहकांचे मोठे नुकसान होत आहे. या कार्यालयात देखील सावळा गोंधळ असून, नागरिकांना रेशनिंग कार्ड वेळेत न मिळणे, नावे कमी करणे अथवा वाढवणे या प्रक्रियेला वर्षभराची प्रतीक्षा करावी लागत आहे. त्याचप्रमाणे ऑनलाइन प्रक्रियेत देखील नागरिकांना वर्षानुवर्ष फेऱ्या माराव्या लागत आहेत.

रेशनिंग दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे धान्य मिळणे ही बाब नवीन नाही. गेली अनेक वर्ष अशा प्रकारच्या तक्रारी वारंवार नागरिकांकडून केल्या जात असल्या तरी शासनाकडून या पुरवठा आणि वितरण व्यवस्थेमध्ये कोणत्याच प्रकारची सुधारणा झालेली दिसून येत नाही. यामुळे राज्यातील गोरगरीब जनतेला निकृष्ट दर्जाचे धान्य उपलब्ध होते. रेशनिंग वरील धान्य पुरवठा ठेकेदाराकडून परस्पर विकण्याचे प्रकारदेखील होत आहेत.



## गणेशोत्सवानिमित्त रक्तदान शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

सूर्योदयसाखरचौथगणेशोत्सव मंडळ थळ पालथी यांच्यावतीने साखरचौथ गणेशोत्सवानिमित्त शनिवारी (दि. २१) रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबिरात ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले. दररोज रक्ताची भासणारी गरज आणि दुसरीकडे रक्ताची निर्माण होणारी टंचाई लक्षात घेता सामाजिक जाणिवेतून सूर्योदय साखरचौथ गणेशोत्सव मंडळाकडून रक्तदान शिबीर घेण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मंडळाच्या अध्यक्षांचे हस्ते करण्यात आले. या शिबिरादरम्यान रक्तसंकलनासाठी जिल्हा शासकीय रक्तपेढीचे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. दीपक गोसावी यांच्या नेतृत्वाखालील टीमने मोलाची कामगिरी बजावली. मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

## शिक्षकांचे मुंबईत हुंकार आंदोलन

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**




शिक्षक समन्वय संघाच्यावतीने १६ ऑगस्टपासून मुबईतील आझाद मैदान येथे शिक्षकांच्या प्रमुख मागण्यासाठी हुंकार आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून गेले ३६ दिवस हजारो शिक्षक आझाद मैदानात तग धरून बसले आहेत. परंतु, सरकार वेळकाढूपणा करत आहे. येणाऱ्या मंत्रीमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत निर्णय झाला नाही तर शिक्षक समन्वय संघाच्यावतीने आत्मदहनाचा इशारा देण्यात आला आहे.

सर्व न्याय मागण्यासाठी मुंबई तसेच उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथे शिक्षक समन्वय संघ महाराष्ट्र राज्य तथा विना अनुदानित कृती समिती महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आंदोलन चालू आहे. या आंदोलनाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने होऊ घातलेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सर्व मागण्या मान्य करून शासन निर्णय काढावा, अशी शासनाला विनंती करण्यात आली आहे. तसेच, इतरही शिक्षकांना जाहीरपणे आव्हान केले आहे.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १०००० . संपर्क- ७८७५८६६५५५.
- घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी आहे. ठिकाण : पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७-३०/८ ते ५ संपर्क :९८६७२१५४९५/९४२२३७५१२४
- LIC Office विजयनगर वरसोली येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क :७५०७९२९१२८/९४२२४९४५९०
- अलिबागमधील नामांकीत मोटार ट्रेनिंग स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : 9823492626/7998619191

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### अलिबागच्या गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून कौतूक

## चलचित्रातून मानवी उत्क्रांतीचा उलगडा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी येथील एका शिक्षकाने ‘माणसाची गोष्ट’ या चलचित्रातून मानवी उत्क्रांतीचा उलगडा केला. अश्मयुगापासून ते वैज्ञानिक युगापर्यंत मानवाच्या राहणीमानात कशा पध्दतीने बदल झाला याची माहिती या चलचित्राद्वारे देण्यात आली. अलिबागचे गटशिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा यांनी नुकतीच भेट देत कौतूक केले.**



रमेश धुमाळ असे या शिक्षकाचे नाव आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी घरी सजावट केली. मोबाईलमध्ये रमणाऱ्या पिढीला मानवाची निर्मिती कशी झाली याची माहिती सहज सोप्या पध्दतीने चलचित्राद्वारे जनतेपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. माणूस हा पृथ्वीवरील सर्वात बुध्दीवान आणि सर्वच क्षेत्रात अधिराज्य गाजवणारा प्राणी आहे. मानवाची उत्क्रांती कशी झाली.

आफ्रिका खंडात दोन पायावर चालणारा वानर तयार झाला. अफ्रिकेतील नैसर्गिक घडामोडीमुळे वानरांचे स्थलांतर झाले. दोन पायावर चालत भटकू लागला. शिकार करण्याबरोबरच स्वरक्षणासाठी दगडापासून हत्यार तयार केले.

ऊन वारा पावसापासून बचाव करण्यासाठी समुहाने गुहेत राहू लागला. हळूहळू त्याच्यामध्ये आमुलाग्र बदल होत गेला. अश्मयुगापासून वैज्ञानिक युगापर्यंत मानवाची प्रगती कशी झाली, याची माहिती या चलचित्राद्वारे देण्यात आली.

याबाबत गटशिक्षणाधिकारी कृष्णापिंगळायांनामाहितीमिळाली. त्यांनी नुकतीच धुमाळ यांच्या घरी जाऊन चलचित्र व देखावे पाहिले. चलचित्रातून इतिहास विषयाची माहिती दिल्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

> **मानवाची उत्पत्ती कशी झाली. त्याचा विकास कशा पद्धतीने झाला. चाकासह इतर साधनसामुग्रीचा शोध कसा लागला, याची माहिती इतिहास पुस्तकात विद्यार्थ्यांना दिली जाते. तीच माहिती रमेश धुमाळ या शिक्षकांनी चलचित्राद्वारे सादर करून एक वेगळा प्रयत्न केला आहे.**
> **– कृष्णा पिंगळा, गट शिक्षणाधिकारी, अलिबाग**

# पालकमंत्र्यांना आश्वासनांचा विसर

## ■ माथेरानकरांना नवीन मिनीबस केव्हा उपलब्ध होणार?
## ■ स्थानिकांमध्ये पसरले नाराजीचे वातावरण



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानसाठी २००८ मध्ये कर्जत-नेरळमार्गे माथेरान मिनीबस सेवा सुरू होऊन जवळपास पंधरा वर्षे पूर्ण झाली आहेत. सर्वसामान्य लोकांना स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाची हमी असणाऱ्या मिनीबस जुन्या झाल्याने अनेकदा घाटरस्त्यात बंद पडण्याच्या घटना घडत असतात. त्यामुळे प्रवाशांना उन्हातान्हात पायपीट करावी लागते. काही महिन्यांपूर्वी मंत्री उदय सामंत यांनी नवीन बस देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, अद्याप या कर्जत-माथेरान मार्गावर नवीन बस उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे स्थानिकांमध्ये नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे.

स्थानिकांनी अनेकदा संघर्षाला सामोरे जाऊन सुरक्षित प्रवास उपलब्ध व्हावा यासाठी कठोर परिश्रम घेऊन ही मिनीबसची सेवा उपलब्ध करून घेतली होती. या मार्गावर दोन बसेस देण्यात आल्या आहेत; परंतु यातील एक बस कर्जत-पनवेल अशी फेऱ्या मारत असून, एक बस कर्जत-नेरळ मार्गे माथेरान अशा फेऱ्या करत आहे. घाट रस्त्यात ही बस वारंवार बंद पडत असते, यामुळे शालेय विद्यार्थी, व्यापारी वर्ग त्याचप्रमाणे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मिनीबसच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातून सर्वाधिक भरघोस उत्पन्न मिळत असतानादेखील परिवहन महामंडळ इकडे का दुर्लक्ष करीत आहे, असा प्रश्न अनेकांमधून उपस्थित केला जात आहे.

चांगल्या दर्जाच्या मिनीबस या मार्गावर सुरू व्हाव्यात यासाठी अनेकदा उपोषणे त्याचप्रमाणे स्थानिकांनी, विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनीदेखील निवेदने कर्जत आगारात त्याचप्रमाणे वरिष्ठांनासुध्दा दिलेली आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटीगाठीसुद्धा घेतलेल्या आहेत; परंतु अद्याप इथे नव्याने बसेस सुरू केलेल्या नाहीत, त्यामुळे स्थानिकांमधून याबाबत प्रचंड नाराजी दिसून येत आहे.

### मिनीबस सेवा जीवनवाहिनी

नेरळ कर्जत अथवा बदलापूर या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मिनीबस सेवा ही जीवनवाहिनी बनली आहे. आजवर शेकडो विद्यार्थ्यांनी परिसरात जाऊन महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्याने ही मुले विविध क्षेत्रात, व्यवसायात, नोकरीत चांगल्या हुद्द्यावर कार्यरत आहेत, तर नियमितपणे प्रवास करणाऱ्या व्यापारी वर्गाला स्वस्त आणि सुरक्षित प्रवास करण्यासाठी ही सेवा खूपच सोयीस्कर बनलेली आहे. कर्जत तालुक्यात सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणारी ही एकमेव बस असल्याचे बोलले जात आहे.

# परतीचा पाऊस धुमाकूळ घालणार

## ■ तालुक्यात भातपिकासाठी पावसाची गरज

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

रायगडात भाताचे पीक उत्तम तरारत असले तरी पुढच्या कापणीसाठी भात तयार होईपर्यंत पावसाच्या पाण्याची आवश्यकता आहे, असे मत मुरूड परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केले आहे. हवामान खात्यानेदेखील दिलेल्या माहितीनुसार राज्यात परतीचा पाऊस धुमाकूळ घालणार असून, रायगड जिल्ह्याचादेखील समावेश आहे. कमी दाबाचा पट्टा तयार होऊन महाराष्ट्राकडे सरकत असल्याने शनिवारपासून पावसाचे अनुकूल वातावरण तयार होत असून, सोमवारपासून पावसाची तीव्रता वाढेल, असे हवामान खात्याने म्हटले आहे.

मुरूड तालुक्यात भातपीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. मुरूड तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांनी सांगितले की, मुरूड तालुक्यात ३२१० हेक्टर जमिनीवर भातलागवड केली जाते. तालुक्यात यंदा उत्तम भातपीक आले आहे. सुवर्णा, वाडा कोलम, जया, जोकर अशा प्रकारातील भात जातीचे पीक लावले जाते. बोर्ली मांडला पंचक्रोशीत अधिक प्रमाणात भातपीक घेतले जाते. बदलते हवामान किंवा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. यासाठी शेतकरी बांधवांनी पीक विमा काढावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. वाणदे गावचे शेतकरी तुकाराम पाटील यांनी सांगितले की, सध्या काही ठिकाणी भात पिकावर खोड किड्याचा प्रादुर्भाव झाला असून, फवारणी करावी लागेल असे वाटते.

तहसील सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, मुरूड तालुक्यात आतापर्यंत २८०९ मिमी पाऊस पडला आहे. शिघ्रे गावचे शेतकरी रघुनाथ माळी यांनी सांगितले की, उखारू भातपीक अद्याप तयार झालेले दिसून येत नाही. पिकाला अजूनही पावसाची गरज आहे. भातपीक तयार होण्यासाठी भरपूर वेळ आहे. तापमान वाढते असल्याने आगामी काही दिवसात विजेच्या गडगडाटासह पाऊस पडेल, असे स्पष्ट संकेत मिळत असल्याचे खारआंबोली, शिघ्रे, विहूर, वावडुंगी, तेलवडे भागातील शेतकऱ्यांनी सांगितले. सध्या तालुक्यातील तापमान २८ ते २९ सेल्सियस आहे.



# आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद


**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्र शासन व वायएमटी होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्या विद्यमाने ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय वडघर येथे २० सप्टेंबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित संपन्न झाला. या आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिराला समीर मोरे, नेहा ठाकूर, श्रुती ठाकूर, सचिन चव्हाण, सरीता मांडे, सपना गुप्ता, थेरीन मेडी, अभिषेक टेलोरे, यशश्री पाटील, ग्रामसेवक मोहन दिवकर उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषद चिंचपाडा शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची तपासणी केली. यामध्ये श्वसनलिकेचे आजार, त्वचारोग, गजकर्ण, मुरुमे, ॲलर्जी पोटाचे विकार, आम्लपित्त, जुलाब, मुतखडा, पित्ताशयाचे खडे, स्त्रियांचे आजार, पाळीच्या तक्रारी, डोकेदुखी लहान मुलांचे आजार इत्यादी आजाराबाबतची तपासणी या शिबिराच्या माध्यमातून करण्यात आली. यावेळी वडघर ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक मोहन दिवकर यांनी हा आरोग्य शिबीर यशस्वी होण्याकारिता मोलाचे सहकार्य केले.

# चंद्रभागा कांबळे यांचे निधन

**पाली :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक कमिटी पालीचे माजीसचिवतथाशैक्षणिक,सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अग्रगण्य असणारे आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक मोरेश्वर रमाकांत कांबळे यांच्या मातोश्री चंद्रभागा रमाकांत कांबळे यांचे दि.१७ रोजी (८०) वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीला उत्तम कुंभार, बांगारे, रिपाइं नेते रवींद्रनाथ ओव्हाळ, राहुल सोनावळे, माजी तालुकाध्यक्ष दिपक पवार, पाली नगरपंचायतीचे नगरसेवक सुधीर भालेराव सुलतान बेनसेकर, नातेवाईक, शिक्षक वर्ग व आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांनी अंत्यविधीवेळी श्रद्धांजली वाहून शोक व्यक्त केला. त्यांच्या पाश्चात दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



# दुचाकीला लागलेल्या धडकेतून मारामारी

## ■ सहा जखमी; सात जणांवर गुन्हे दाखल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

चिंचवली गावातील दुचाकीला अज्ञात चारचाकी वाहनाने धडक देऊन नुकसान केले.त्यानंतर त्या नुकसानीची भरपाईसाठी कर्जत चारफाटा येथे बोलावण्यात आले. चार फाटा येथे गेल्यावर मध्यस्थी किरण बोराडे यांच्यासोमर हॉकी स्टिकने मारहाण करण्यात आली. त्यानंतर ही भांडणे चिंचवली गावात पोहोचली आणि रात्री चिंचवली गावात दगड तसेच लाठीकाठ्या यांच्या सहाय्याने मारहाणीची घटना घडली आहे. दरम्यान, या मारहाणीमध्ये सहा जण जखमी झाले असून, सात जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

चिंचवली गावातील समीर हरिश्चंद्र मिणमिने यांच्या दुकानासमोर नागेश कोळंबे यांच्या दुचाकीला अनोळखी चारचाकी गाडीची धडक लागली. त्यावेळी अक्षय बुंधाटे याने मोटारसायकल चालक नागेश कोळंबे यास मोटारसायकल नुकसानीची भरपाई करुन द्यायला सांगतो, असे सांगून साक्षीदार किरण बोराडे यांनी चारफाटा कर्जत येथे बोलावून घेतले. तेथे अक्षय बुंधाटे याने त्याचे गाडीतून हॉकी स्टीक घेऊन गाडीतून खाली उतरुन मारण्यास धावून आला. सदरची भांडणे साक्षीदार किरण बोराडे याने सोडवली नंतर फिर्यादी हे चिंचवली येथे त्यांचे दुकानाजवळ गेले असता तेथे आरोपी क्र.१ हा मागोमाग त्याचे ताब्यातील गाडीतुन फिर्यादीच्या दुकानात समोर आला नंतर तेथे आरोपी क्र. ०२ व ०३ हे सुध्दा हातात काठी व चॉपर घेवुन आले व त्यांनी संगनमत करुन पैश्याच्या वादावरुन फिर्यादी याचे हातावर उपट मारली तेथे भांडणाचा आवाज ऐकुन फिर्यादी यांचा मेव्हुना नरेश बुधाटे व पत्नी वृषाली मिणमिणे फिर्यादी यांचा मुलगा चिराग हे आले. त्यांना सुध्दा हातावर उपटी मारुन दुखापत केली तसेच आरोपी क्र २ याने त्याचे हातातील काठीने फिर्यादी याचा भाऊ सोमनाथ मिणमिणे यास डोक्यावर मारुन दुखापत केली. आरोपी क्र ३ याने चॉपरने फिर्यादी यांचा मेव्हुना नरेश बुंधाटे याचे डोक्यात मारुन दुखापत केली तसेच फिर्यादी यांचा मुलगा चिराग याचे डोक्यात पाठीवर मारुन दुखापत केली. तर चिंचवली गावी रात्री अविनाश ज्ञानेश्वर बुंधाटे आणि अक्षय ज्ञानेश्वर बुंधाटे यांच्या डोक्यात तसेच हातावर उजव्या खांद्यावर दगड आणि लाठीकाठ्या यांच्या मदतीने दुखापत केली. त्यावेळी समीर मिनमिने, नरेश बुंधाटे, जयेश बुंधाटे, चिराज समीर मिनमिने, सोमनाथ मिनमिणे यांनी मारहाण केली. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाणे येथे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले असून, या दोन्ही गुन्ह्यांचा तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन मंडलिक करीत आहेत. या दोन्ही घटनात अविनाश बुंधाटे, अक्षय बुंधाट, समीर मिणमिने, नरेश बुंधाटे, वृषाली मिनमिने, चिराग मिनमिने हे सहा जण जखमी झाले आहेत. तर सात जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मेडिकवर हॉस्पिटलचा आरोग्य मेळावा उत्साहात

**। पनवेल । वार्ताहर ।**

आपला आहार हा शारीरिक स्वास्थ्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. बदलत्या जीवनशैलीमुळे आहाराच्या चुकीच्या सवयी लागत असून, यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो. मेडीकवर हॉस्पिटल नवी मुंबईने नुकतेच पोषक आहार आणि जीवनशैलीसंबंधित योग्य बदलांना देण्यासाठी अनोखा अशा पोषण मेळाव्याचे आयोजन केले आहे. डाएटीक्स विभागातर्फे आयोजित या कार्यक्रमाला रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसह इतर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संतुलित आहाराच्या महत्त्वाविषयी उपस्थितांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने या मेळाव्यामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मोफत शरीर रचना विश्लेषण : यामध्ये प्रशिक्षित आहार तज्ज्ञांकडून उपस्थितांच्या शरीर रचनेचे विश्लेषण करण्यात आले, ज्यामध्ये सहभागींचे आरोग्य आणि फिटनेसबद्दल त्यांना योग्य माहिती देत त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. महत्त्वाच्या तपासण्या: उपस्थितांना त्यांच्या एकूण आरोग्याचे मूल्यांकन करण्यात मदत करण्यासाठी या कार्यक्रमात रक्तातील साखरचे पातळी तपासणे आणि रक्तदाब तपासण्यांसह मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

डॉ. राजेश्वरी पांडा (मेडिकवर हॉस्पिटल,नवीमुंबईच्या आहारशास्त्र विभागाच्या प्रमुख) यांनी या कार्यक्रमाच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. या पोषण मेळाव्यात अनेक नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले, याचा आम्हाला आनंद झाला. या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल करण्यासाठी प्रोत्साहित करणे हे आमचे मुख्य ध्येय होते. हा कार्यक्रम आमच्या सर्वच स्तरातील नागरिकांशी जोडण्याचा आणि निरोगी सवयींना प्रोत्साहन देण्याची एक उत्तम संधी होती. मेडिकवर हॉस्पिटल नवी मुंबई हे सर्वप्रकारच्या आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी आणि निरोगी जीवन जगण्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील आहे. हा पोषण मेळावा समाजाला शिक्षित आणि सक्षम करण्यासाठी एक उदाहरण ठरत आहे.

# ४४ लाखांची वीजचोरी उघड

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

महावितरणच्या टिटवाळा उपविभागात वीजचोरांविरुद्ध धडक मोहीम नियमितपणे सुरू आहे. उपविभागातील सर्वाधिक गळती असलेल्या वीज वाहिनीवर गेल्या दीड महिन्यात केलेल्या तपासणीत १८४ जणांकडे ४४ लाख रुपयांची वीजचोरी आढळली. या सर्व १८४ जणांविरूद्ध मुरबाड पोलीस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली १ ऑगस्ट ते १७ सप्टेंबर या दीड महिन्यांच्या कालावधीत ही कारवाई करण्यात आली. मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत टिटवाळा मंदिर, बल्याणी, बनेली, मांडा पश्चिम भागात १३४ तर गोवेली शाखेंतर्गत म्हारळ व वरप भागात ५० जणांकडे वीजचोऱ्या आढळून आल्या. यात वीजबिल थकबाकीमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ४० ग्राहकांचा समावेश आहे.

# आदिवासी कार्यकर्ते ठाकरे गटात

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील पळसदरी ग्रामपंचायतीमधील वर्णे ठाकूरवाडी येथील आदिवासी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडचिट्ठी देत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. शिवसेना ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांच्या उपस्थितीत या सर्व कार्यकर्त्यांनी ठाकरे पक्षात प्रवेश केला. शिवालय या पक्ष कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, भिमसेन बडेकर, कृष्णा जाधव यांच्यासह पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते संदीप सुर्वे, सोहम शिंदे, श्रेय सुर्वे यांच्या उपस्थितीत हे प्रवेश झाले.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक सौ. सोनी हेमराज सोनी यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| २२ | २अ | ०-२९-६ | ४-५० |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. २३/०९/२०२४.
**ॲड. सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग को.ऑ.हौ.
सो.ब्राम्हण आळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९८५०४०२६५७.

### पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण रायगड

**आचार्य मो.वा दोंन्दे मार्ग शिक्षक मित्र सहकार नगर शिक्षक सोसायटी पेण**
**मोबाईल नंबर ७३९७८९०५४५**
**कर्मचारी भरती २०२४**

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.पेण रायगड या संस्थेच्या पेण व शाखा कार्यालयात १ लेखनिक व १ संगणक तज्ञ अशा दोन पदाच्या जागा हंगामी करार पद्धतीने तीन वर्ष उक्ते पगारावर भरावयाच्या आहेत. लेखनिक तीन वर्ष उक्ते पगार १५,०००/- व संगणक तज्ञ तीन वर्षे उक्ते पगार २०,०००/- रू. प्रतिमहा मानधनावर खालील अटीनुसार भरावयाच्या आहेत. तरी खालील पात्रता असणाऱ्यांनी दिनांक २७/०९/२०२४ पर्यत संस्थेच्या पेण कार्यालयात कार्यालयीन वेळेत अर्ज करावेत अर्जाचा नमुना पेण कार्यालयात २००/- रूपये फी भरून मिळेल.

**पद:-लेखनिक १-सवर्ग- ओ.बी.सी./एन.टी/एस.सी/एस.टी. सर्वसाधारण**

**पद:- संगणक तज्ञ १ सवर्ग- ओ.बी.सी./एन.टी/एस.सी/एस.टी. सर्वसाधारण**

१) **लेखनिक पद-** शैक्षणिक पात्रता-वाणिज्य शाखेचा पदवीधर (बी कॉम) पास
२) महाराष्ट्र शासनाची एम.एस.सी.आय.टी. संगणक परिक्षा पास
३) महाराष्ट्र शासनाची टंकलेखन मराठी व इंग्रजी प्रती मिनिट ३० शब्दगतीने पास असणे आवश्यक आहे.
४) सहकार पदविका परिक्षा एल.डी.सी/डि.सी.एम परिक्षा पास असणे आवश्यक आहे.
५) दिनांक ०१-०९-२०२४ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्ष पुर्ण असावे व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. कामाचा अनुभवास प्राधान्य देण्यात येईल प्रोवेशन कालावधी ३ वर्ष राहील.

१) **संगणक तज्ञ-** उमेदवार सॉफ्टवेअर इंजीनियर मधील पदवी किंवा पदवीकाधारक असावा. संस्थाच्या सॉफ्टवेअर कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा/सहकार क्षेत्रातील कामाचा अनुभव असावा व महाराष्ट्र शासनाची टंकलेखन मराठी व इंग्रजी प्रती मिनिट ३० शब्दगतीने पास असणे आवश्यक आहे. प्रोवेशन कालावधी ३ वर्षे राहील. उमेदवाराचे वय १-९-२०२४ रोजी १८ वर्षे पूर्ण व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**टिप:- संगणक तज्ञ उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्या ऐवजी १ लेखनिक पद भरण्यात येईल तसेच कर्मचारी भरती करण्याचे सर्व अधिकार संचालक मंडळाकडे राहतील.**

**श्री. मोहन बाळाराम भोईर** — चेअरमन
**श्रीम.उज्वला जगन्नाथ कनोजे** — व्हा. चेअरमन
**श्री. सोपान रामचंद्र चांदे** — मानद सचिव
**श्री. नितिन वसंत वर्तक** — सेक्रेटरी

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक आशिष चारुदत्त देसाई यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-मोहिली तर्फे वासरे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग /सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २८/२/अ | एकुण क्षेत्र ०-४७-५० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे क्षेत्र ०-२०-०० हे आर पॉ | ४-८१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लोज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २३/०९/२०२४
**ॲड. निलेश कान्हू मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र अर्ज ४५/२०२४

प्रति,
श्री. महेंद्र रामभाऊ पाटील
रा. रांजणखार डावली, नवखार — अर्जदार
पो. सारळ,
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत रांजणखार डावली,
मु. रांजणखार डावली, — सामनेवाला
ता.अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे रांजणखार डावली, नवखार पो. सारळ, ता. अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आई कै. सिताबाई रामभाऊ पाटील यांचा मृत्यु दि १०/१२/१९९८ रोजी ग्रामपंचायत रांजणखार डावली येथील मौजे रांजणखार डावली येथील राहत्या घरी झाला होता.

२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत रांजणखार डावली येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत रांजणखार डावली यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि. २०/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.२०/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २०/०९/२०२४
सही/-
**(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

### जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील हे याखालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) खरेदीसाठी इच्छुक असल्याने आम्ही **आदित्य हर्षवदन मंगलदास** (यापुढे 'मालक'असे उल्लेखित) यांचे मालकी हक्क तपासत आहोत.

कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरूद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा मागणी/किंवा आक्षेप जसे की, विक्री अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफ.एस.आय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे लिखित सुचनेसह **झुंजारराव आणि कं., ॲडव्होकेट आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबध, दावा मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सुचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून **१४ (चौदा)** दिवसांचे आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसुची**

नोंदणीकृत जिल्हा व उप जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - झिराड, तालुका अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भुमापन क्रमांक व उपविभाग २१४/१, एकुण बिनशेती क्षेत्र ४७.९५.०० (आर.चौ.मी.) आकारणी रू.४८०.००/- (जुना सर्व्हे नं. ११५/२ ब, जुना गट नं. २९१ आणि गट नं. २१४) आणि भुमापन क्रमांक व उपविभाग २१५/१, एकुण बिनशेती क्षेत्र ४७.९५.०० (आर.चौ.मी.) आकारणी रू.४८०००/- (जुना सर्व्हे नं. ११५/२अ, जुना गट नं. २९२ आणि गट नं. २१५).

ठिकाण - अलिबाग
दिनांक -२३/०९/२०२४
**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

**निवडक**

## राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा

**नवी दिल्ली :** प्रमुख शहरांच्या माघारीमुळे चर्चेत राहिलेली २०२६ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आता स्कॉटलंडची राजधानी ग्लोसगो येथे आयोजित केल्या जातील. या स्पर्धा सुरुवातीला ऑस्ट्रेलियात व्हिक्टोरियात होणार होत्या. मात्र, आयोजनाच्या प्रस्तावित खर्चात प्रचंड वाढ झाल्याचे लक्षात आल्यावर व्हिक्टोरियाने जुलै २०२३ मध्ये आयोजनातून माघार घेतली होती. या निर्णयामुळे व्हिक्टोरियाकडे २५६ दशलक्ष डॉलर इतकी नुकसानभरपाई मागण्यात आली होती.

## शेर्न वॉनची बरोबरी

**चेन्नई :** स्टार फिरकी गोलंदाज आर अश्विन याने ऑस्ट्रेलियाचा महान माजी फिरकीपटू शेन वॉर्न याची बरोबरी केली. वॉर्नने कसोटी कारकिर्दीत ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्याहून अधिक विकेट्स घेतल्या होत्या. वॉर्नने १४५ कसोटी सामन्यात १८ वर्षांपूर्वी ही कामगिरी केली होती. अश्विनने १०१ व्या कसोटीत ही कामगीरी केली आहे. तसेच त्याने न्यूझीलंडचा महान फलंदाज रिचर्ड हॅडलीला मागे टाकले. ३६ वेळा एका डावात ५ विकेट्स घेण्याचा हॅडलीच्या नावावर विक्रम आहे.

## सीएसकेमधून धोनी खेळणार

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२५ अजून दूर आहे. चेन्नई सुपर किंग्स मेगा लिलावापूर्वी एमएस धोनीला कायम ठेवणार आहे. सीएसकेने पुढील मोसमात कायम ठेवलेल्या खेळाडूंच्या यादीत धोनीचे नाव निश्चितपणे सामील होणार असल्याचे उघड झाले आहे. एमएस धोनीशिवाय ऋतुराज गायकवाड आणि संघाचा माजी कर्णधार रवींद्र जडेजा यांनाही कायम ठेवण्याची शक्यता आहे. मेगा लिलावापूर्वी, सीएसके अष्टपैलू शिवम दुबेलाही संघात घेऊ शकते.

## ४५ लाखांची मागणी

**नवी दिल्ली :** डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेत भारताकडून खेळण्यासाठी एकेरीतील आघाडीचा खेळाडू असलेल्या सुमित नागलने वार्षिक ५० हजार अमेरिकन डॉलर म्हणजेच अंदाजे ४५ लाख रुपयांची मागणी केल्याचा दावा अखिल भारतीय टेनिस संघटनेने (एआयटीए) केला आहे. एकेरीतील भारताचा अव्वल पुरुष टेनिसपटू असलेल्या सुमितने पाठदुखीमुळे डेव्हिस चषकात नुकत्याच झालेल्या जागतिक गट-१ मधील स्वीडनविरुद्धच्या लढतीतून माघार घेतली होती.

## ३७७ कोटींचा मालक

**बारबाडोस :** वेस्ट इंडिजचा दिग्गज विस्फोटक फलंदाज क्रिस गेल जगाराभरामध्ये प्रसिद्ध आहे. ख्रिस गेलची गोष्ट गरिबीतून उठून जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेटपटू बनण्याची आहे. ख्रिस गेलला त्याच्या सुरुवातीच्या काळात खूप आर्थिक संकटाचा सामना करावा लागला होता. आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्याने प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून विकल्या होत्या. आता मात्र, त्यांची एकूण संपत्ती ३७७ कोटी रुपये आहे. त्याचा प्रवास प्रेरणादायी आहे.

# बांग्लादेशाचे भारतासमोर लोटांगण

- पहिल्याच कसोटीत केला २८० धावांनी पराभव
- ९२ वर्षातील पहिली कामगीरी

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात बांगलादेशचा तब्बल २८० धावांनी पराभव केला आहे. भारताने बांगलादेशला विजयासाठी ५१५ धावांचे आव्हान दिले होते आणि २३४ धावांवर बांगलादेशला ऑल आऊट करत कसोटी मालिकेत १-० ने आघाडी मिळवली आहे.




रविचंद्रन अश्विनच्या ६ विकेट्सच्या जोरावर भारताने दुसऱ्या डावात एकतर्फी दबाव आणला. भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना टीम इंडियाने सहज जिंकला. भारताच्या विजयात आर. अश्विनची भूमिका महत्त्वाची होती. अश्विनने पहिल्या डावात शतक झळकावत भारताचा डाव सावरला आणि दुसऱ्या डावात विक्रमी ६ विकेट्स घेत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. बांगलादेशला हरवून भारताने कसोटी क्रिकेटमध्ये मोठी कामगिरी केली आहे. भारतीय क्रिकेट संघाने १९३२ साली कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तेव्हापासून भारताने एकूण ५८० सामने खेळले आहेत. ९२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच टीम इंडियाने पराभवापेक्षा जास्त विजयाचा आकडा गाठला आहे. बांगलादेशचा पराभव करून टीम इंडियाने कसोटी क्रिकेटमधील १७९ वा विजय संपादन केला आहे. तर, संघाला १७८ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. आतापर्यंत भारतातील कसोटी क्रिकेटच्या ९२ वर्षांच्या इतिहासात असे घडले नव्हते. भारताने २२२ सामने अनिर्णित खेळले आहेत, तर भारताचा एक सामना रद्द झाला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये पराभवापेक्षा जास्त विजय नोंदवणारा भारत हा जगातील पाचवा संघ ठरला आहे.

याआधी ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तानच्या संघांनी अशी कामगिरी केली आहे. ऑस्ट्रेलियाने ८६६ सामन्यांपैकी ४१४ सामने जिंकले आहेत आणि २३२ सामने गमावले आहेत. इंग्लंड संघाने १०७७ सामन्यांपैकी ३९७ सामने जिंकले असून ३२५ सामने गमावले आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या संघाने ४६६ कसोटी सामन्यांपैकी १७९ सामने जिंकले आहेत आणि १६१ सामने गमावले आहेत. ४५८ सामन्यांपैकी पाकिस्तानने १४८ सामने जिंकले असून १४४ सामने गमावले आहेत.

## ऑलिम्पियाड करंडक गहाळ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सर्वोत्तम सांघिक कामगिरीसाठी देण्यात येणारा नोना गाप्रिंदाश्वाली फिरता करंडक भारताने दोन वर्षांपूर्वी जिंकला होता; मात्र भारताकडून हा करंडक हरवला आहे. जागतिक बुद्धिबळ महासंघाने हा करंडक परत करण्याची आठवण केल्यावर शोधाशोध सुरू झाली; पण त्यात अपयश येत असल्यामुळे पर्यायी करंडक तयार होत असल्याचे भारतीय बुद्धिबळ महासंघातील सूत्रांनी सांगितले. दोन वर्षांपूर्वी चेन्नईत बुद्धिबळ ऑलिम्पियाडचे आयोजन केले होते. त्यातील खुल्या; तसेच महिला विभागात भारताने कांस्य पदक जिंकले होते. या ऑलिम्पियाडमध्ये सर्वांगीण कामगिरी करणाऱ्या संघास गाप्रिंदाश्वाली फिरता करंडक देण्यात येतो. भारतास हा करंडक देण्यात आला. त्या वेळी तत्कालीन भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी तो जल्लोषात स्वीकारला होता.

## कुस्ती स्पर्धेत आवास हायस्कूलचे यश

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुकास्तरिय कुस्ती स्पर्धा नुकतीच चोंढी येथील स. म. वडके विद्यालयाच्या मैदानात शुक्रवारी पार पडली. या स्पर्धेत आवास येथील बाबासाहेब नाजरे हायस्कूल व ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नेत्र दिपक खेळ करून घवघवीत यश संपादन केले.




वेगवेगळ्या वजनी गटामध्ये ही स्पर्धा घेण्यात आली. १४ वयोगटातील मुलांच्या गटात पवन मांझी, मयूर कोकळे, केतन केंडे, आश्लेष पाटील, आर्यन लोभी, तनिष पाटील, श्रवण भगत तसेच १७ वर्षे वयोगटातील फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात अक्षय वरक, गजानन काकळे, नाविन्य वर्तक, अंश नाखवा, संस्कार भगत, ग्रिको रोमन कुस्ती प्रकारात ऋत्विक शिळदणकर, वरद सांगले, दुर्वेश पाटील, अधिराज व्हडगीर, संकल्प भगत तर, १९ वर्षे वयोगटातील फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात स्वप्नी हंबीर, ओम धोंडसेकर, ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात अमृत हंबीर, प्रमोद वरक यांनी चांगली कामगारी बजावली. १४ वर्षे वयोगटातील (मुली ) मीरा पाटील, समीक्षा पाटील, मनिषा थापा, लक्ष्मी थापा यांनी तर, १७ वर्षे वयोगटातील सृष्टी मढवी यांनी खेळ दाखवत यश संपादन केले. यामध्ये प्रथम व द्वीतीय क्रमांक विद्यार्थ्यांनी मिळवून शाळेचे नाव लौकीक वाढला. प्रथम क्रमांक संपादन करणाऱ्या १७ हून अधिक विद्यार्थ्यांची खोपोली येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धे साठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्यावतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

## समीत द्रविडचे स्वप्न अपुरे राहणार?

### ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंडर-१९ मालिकेत संधी नाही

**। पुदुच्चेरी । वृत्तसंस्था ।**

भारतीय अंडर- १९ संघ आणि ऑस्ट्रेलिया अंडर-१९ यांच्यात पुदुच्चेरी येथे सामना रंगला होता. या सामन्यात भारताच्या युवा सेनेला आपला दबदबा कायम ठेवण्यात यश मिळाले. दोन्ही संघामध्ये एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. या सामन्यात एका गोष्टीने सगळ्यांचे लक्ष वेधले ती म्हणजे समित द्रविडला संघात स्थान देण्यात आले नाही.



या पहिल्या एक दिवसीय सामन्यात केपी कार्तिकेय (८५*) आणि कर्णधार मोहम्मद अमान (५८*) यांनी भारताला सहज विजय मिळवून दिला. या दोन्ही खेळाडूंच्या भागीदारीमुळे चौथ्या विकेटसाठी १५३ धावांच्या अखंड भागीदारीच्या जोरावर भारतीय अंडर-१९ संघाने तीन सामन्यांच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलिया अंडर-१९ संघाचा पराभव केला. या मालिकेत शनिवारी भारताने ऑस्ट्रेलियाला सात गडी राखून पराभूत केले. या सामन्यातून राहुल द्रविड यांचा मुलगा समित भारतीय ज्युनियर संघासाठी पदार्पण करेल असे मानले जात होते, परंतु सांघिक संयोजन किंवा काही दुखापतीमुळे त्याला वगळण्यात आले की नाही याचे कारण अजून स्पष्ट झाले नाही.

स्टीव्ह होगन (४२) आणि रिले किंग्सले (३६) यांच्या योगदानापूर्वी ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना ४९.४ षटकांत १८४ धावा केल्या. उजव्या हाताचा लेगस्पिनर मोहम्मद अननने १० षटकांत ३२ धावा देत चार बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाने ३२ धावांत तीन विकेट गमावल्या, मात्र कार्तिकेय आणि अमन यांनी ऑस्ट्रेलियन गोलंदाजांना एकही संधी दिली नाही. या काळात कार्तिकेयने आक्रमक फलंदाजी केली. त्याने ९९ चेंडूत नाबाद ९ चौकार आणि दोन षटकार मारले. अमनने ८९ चेंडूंच्या संयमी खेळीत पाच चौकार लगावले. समित द्रविड हा अष्टपैलू खेळाडू आहे. समितचा जन्म १० नोव्हेंबर २००५ रोजी झाला. त्याने कनिष्ठ स्तरावर बीसीसीआयच्या देशांतर्गत कूचबिहार करंडक स्पर्धेत कर्नाटकसाठी चांगली काम गिरी केली. समितकडे वेगवान गोलंदाजी करण्याची क्षमता आहे. कर्नाटकच्या घरगुती-२० लीग महाराजा ट्रॉफीमध्ये म्हैसूर वॉरियर्सकडून तो खेळतो.

# ऑस्ट्रेलियाचा सलग १४ वा एकदिवसीय विजय

### दुसऱ्या सामन्यात इंग्लंडचा ६८ धावांनी धुव्वा

**। इंग्लंड । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलिया क्रिकेट टीमची एकदिवसीय क्रिकेटमध्ये विजयी घोडदौड सुरुच आहे. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडवर दुसऱ्या एकदिवसीय सामन्यामध्ये ६८ धावांनी विजय मिळवला आहे. ऑस्ट्रेलियाचा हा या ५ सामन्यांच्या मालिकेतील सलग दुसरा विजय ठरला आहे. तसेच ऑस्ट्रेलियाचा हा २०२३ पासूनचा सलग १४ वा एकदिवसीय विजय आहे.



इंग्लंडने ऑस्ट्रेलियाला विजयासाठी २७१ धावांचं आव्हान दिलं होतं. मात्र, इंग्लंडला या धावांचा पाठलाग करताना धड ४१ ओव्हरही पूर्ण खेळता आल्या नाहीत. इंग्लंडचा डाव हा ४०.२ ओव्हरमध्ये २०२ धावांवर आटोपला. ऑस्ट्रेलियाकडून जेमी स्मिथ याने ४९ धावा केल्या. तर इतरांनीही योगदान दिलं. मात्र ते योगदान विजय मिळवण्यासाठी अपुरे पडले.

इंग्लंडकडून जेमी स्मिथ याने ६१ बॉलमध्ये ६ फोर आणि २ सिक्सच्या मदतीने ४९ धावा केल्या. ओपनर बेन डकेट याने ३२ तर फिलिप सॉल्ट याने १२ धावांचं योगदान दिलं. कॅप्टन हॅरी ब्रूकने ४ धावा करुन मैदानाबाहेरचा रस्ता धरला. विल जॅक्स आला तसाच परत गेला. लियाम लिविंगस्टोन यानेही तसंच केलं. या दोघांना खातं उघडता आलं नाही. त्यानंतर प्रत्येकाने २० प्लस स्कोअर करुन विजयाचा आशा कायम ठेवल्या. मात्र इंग्लंड पराभव टाळू शकली नाही. जेकब बेथेल २५, ब्रायडन कार्स २६ आणि आदिल रशीद याने २७ धावांचं योगदान दिलं. ओली स्टोन १ धावेवर आऊट झाला. यासह इंग्लंडचा डाव आटोपला. मॅथ्यू पॉट्स हा ७ धावांवर नाबाद राहिला.

ऑस्ट्रेलियाकडून एकूण ६ जणांनी बॉलिंग केली. त्यापैकी मॅथ्यू शॉर्ट याला इतरांच्या तुलनेत फार संधी न मिळाल्याने विकेट मिळाली नाही. मॅथ्यूने एकमेव ओव्हर टाकली. तर मिचेल स्टार्क याने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. जोश हेझलवूड, आरोन हार्डी आणि ग्लेन मॅक्सवेल या तिघांनी प्रत्येकी २-२ विकेट्स मिळवल्या. एडम झॅम्पा याने १ विकेट घेत इतरांना चांगली साथ दिली.

# हरमनप्रीत सिंगला सर्वोत्तम खेळाडूसाठी नामांकन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पॅरिसमध्ये सलग दुसरे ऑलिम्पिक ब्राँझपदक मिळवून देणारा भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंग याला जागतिक हॉकीमधील सर्वोत्तम खेळाडूसाठी नामांकन देण्यात आले आहे.

हुकमी ड्रॅग फ्लिकर म्हणून दरारा निर्माण करणाऱ्या हरमनप्रीतने ऑलिम्पिकमध्ये आठ सामन्यांतून सर्वाधिक १० गोल केले आहेत. हॉकी क्षेत्रातील हा प्रतिष्ठेचा पुरस्कार हरमनप्रीतला २०२० आणि २०२२ मध्येही मिळालेला आहे. सर्वोत्तम हॉकी खेळाडूसाठीच्या या पुरस्कारासाठी पुन्हा नामांकन मिळणे हा मोठा सन्मान असल्याचे हॉकी इंडियाने म्हटले आहे. तर हॉकी विश्वातील नामवंत खेळाडूंमध्ये आपलाही समावेश झाला आहे आणि हे माझ्या संघसहकाऱ्यांशिवाय शक्य नाही, असे हरमनप्रीत म्हणाला. पॅरिस ऑलिंपिकमध्ये मी केलेल्या सर्व गोलांमध्ये सहकाऱ्यांचा मोठा वाटा आहे. त्यांनी निर्माण केलेल्या संधींमुळे मी गोल करू शकलो, असेही हरमनप्रीतने सांगितले.




हरमनप्रीतसह या पुरस्काराच्या शर्यतीत नेदरलँडसचे थिएरी ब्रिंकमन, जोएप डी मोल, जर्मनीचा हनेस मुल्लेर आणि इंग्लंडचा झॅच वॉलेन्स हे खेळाडू आहेत. वर्षातील सर्वोत्तम हॉकी खेळाडूची निवड करताना २०२४ मध्ये झालेल्या सर्व सामन्यांचा विचार केला जाणार आहे. त्यात कसोटी सामने, प्रो हॉक लीग, हॉकी नेशन्स कप, ऑलिंपिक पात्रता स्पर्धा आणि ऑलिंपिकमधील सामने यांचा समावेश आहे. हरमनप्रीतने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० गोल पेनल्टी कॉर्नरवर केले, तर तीन गोल पेनल्टी स्ट्रोकवर केले. या स्पर्धेत सर्वाधिक गोल त्याच्याच नावावर आहेत. ही पॅरिस ऑलिम्पिक आपल्यासाठी सर्वात फलदायी स्पर्धा होती आणि सहकाऱ्यांनी कठीण काळात दिलेले सहकार्य मोलाचे होते. विश्वकरंडक स्पर्धेत मला पेनल्टी कॉर्नरवर गोल करता येत नव्हते; परंतु सर्व सहकारी माझ्या पाठीशी उभे राहिले होते, अशी आठवण त्यांनी सांगितली. माझ्या अपयशाची खंत मला सहकाऱ्यांनी कधीच जाणवू दिली नाही. विश्वकरंडक स्पर्धेतील अपयशाची भरपाई ऑलिम्पिकमध्ये करण्याची जिद्द बाळगली होती. सलग दुसऱ्या ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवणे हासुद्धा मोठा सन्मान आहे. त्यासाठी सहकाऱ्यांनी कर्णधार म्हणून माझ्यावर विश्वास कायम ठेवला होता, त्यामुळे मी त्यांचा ऋणी असल्याचे हरमनप्रीतने सांगितले.

## दुसऱ्या कसोटीसाठी टीम इंडियाची घोषणा

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

येथील कसोटीत धमाकेदार विजयानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने कानपूरमध्ये खेळल्या जाणाऱ्या दुसऱ्या कसोटीसाठी टीम इंडियाची घोषणा केली आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुसरा कसोटी सामना २७ सप्टेंबरपासून कानपूरमध्ये खेळवला जाणार आहे. बांगलादेशविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटीसाठी निवड समितीने तोच संघ कायम ठेवला आहे.

बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीसाठी भारताचा संघ- रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, सर्फराज खान, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (राखीव यष्टिरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, आकाश दीप, जसप्रीत बुमराह आणि यश दयाल यांचा समावेश आहे.

दुलीप करंडक स्पर्धेत शानदार शतक झळकावणारा ईशान किशन आणि सलग अर्धशतके झळकावणारा ऋतुराज गायकवाड या खेळाडूंकडे पुन्हा दुर्लक्ष करण्यात आले आहे. यानंतर श्रेयस अय्यरची दुसऱ्या कसोटीसाठी निवड झालेली नाही. आर. अश्विन भारताच्या विजयाचा हिरो ठरला आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिली कसोटी टीम इंडियाने २८० धावांनी जिंकली. या सामन्याचा निकाल चौथ्या दिवशीच लागला. लंचपूर्वी बांगलादेशचा संघ २३४ धावांवर गडगडला. आर अश्विन भारताच्या विजयाचा हिरो ठरला, त्याने दुसऱ्या डावात ६ विकेट्स घेतल्या आणि दमदार फलंदाजी करत शतकही झळकावले.

अश्विनच्या ११३ धावा आणि रवींद्र जडेजाच्या ८६ धावांच्या बळावर भारताने पहिल्या डावात ३७६ धावा केल्या. प्रत्युत्तरात बांगलादेशचा संघ पहिल्या डावात अवघ्या १४९ धावांत सर्वबाद झाला.

भारताकडून पहिल्या डावात जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ४ विकेट घेतल्या. अशा प्रकारे टीम इंडियाला पहिल्या डावात १४९ धावांची आघाडी मिळाली. यानंतर दुसऱ्या डावात भारताने ४ बाद २८७ धावांवर डाव घोषित केला.

त्यानंतर बांगलादेशला ५१५ धावांचे लक्ष्य मिळाले, ज्याचा पाठलाग करण्यात बांगलादेशचा संघ अपयशी ठरला आणि चौथ्या दिवशी २३४ धावांवर सर्वबाद झाला. या सामन्यात अश्विनचे मात्र सर्वांकडून चांगलेच कौतुक करण्यात येत आहे. त्याने असेच सातत्य ठेवावे.

### श्रीवर्धन तालुक्यातील गोखले महाविद्यालयात

# ‘रायगड जिल्हा शालेय क्रीडा-स्पर्धा 2024’ संपन्न

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**

श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रविवारी २२ सप्टेंबर २०२४ रोजी रायगड जिल्हा शालेय क्रिडा स्पर्धा २०२४ चे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. श्रीनिवास जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या क्रिडा स्पर्धांचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. किशोर लहारे यांच्या अध्यक्षतेखाली व श्रीवर्धन तालुका गट शिक्षणाधीकारी धामणकर यांच्या हस्ते संपन्न झाले.



या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाला तालुका क्रिडा समन्वयक, विजय मर्चंडे, प्राथमिक शाळा केंद्र प्रमुख केतकर, क्रिडा पंच प्रमुख समीर वाळवटकर, गोखले कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख, प्रा. नवज्योत जावळेकर, न्यु मॉडर्न स्कूल आराठी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका वैशाली सावंत तसेच श्रीवर्धन तालुक्यातील सर्व माध्यमिक-उच्च माध्यमिक शाळांचे क्रिडा-शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना उपप्राचार्य किशोर लहारे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणा बरोबरच क्रिडा स्पर्धांमधून आपल्याबरोबरच आपल्या शाळेचा नावलौकिक वाढवावा, असे सांगितले. शिक्षणाधिकारी धामणकर यांनी या क्रिडा स्पर्धा निकोप व खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाव्यात, असे आवाहन केले. या प्रसंगी प्रा. जावळेकर यांनी सर्वांचे आभार मानले. या क्रिडा स्पर्धांच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य व गोखले शिक्षण संस्थेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून कौतुक व अभिनंदन करण्यात आले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)